दैनिक सोलापूर

असत्याच्या दुनियेतील सत्य शोधणारे सायं दैनिक

कटूसत्य

किंमत ५ रुपये

Email - katusatya@gmail.com
www.katusatyanews.com

सोलापूर | RNI No . MAHMAR 2006/17624 | वर्ष २१ वे, अंक ८९ वा | शनिवार, दि. ३१ ऑक्टोबर २०२६ | पाने: ४ | पोष्ट परवानाः - SLP/04/2026-2028 Posted at - R.M.S.Post Office SOLAPUR

उजनीच्या पाण्यावरून रोहित पवार विरुद्ध देवेंद्र कोठे !

विकास की जलसंकट, सोलापूरच्या राजकारणात नवा संघर्ष

रोहित पवारांचा रास्ता रोकोचा एल्गार; कोठेंकडून शासनाच्या २८ मुद्द्यांचा दाखला देत प्रकल्पांचे समर्थन; नऊ टीएमसी की अर्धा टीएमसी, आकड्यांच्या दाव्यांमुळे संभ्रम

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- उजनी धरणाच्या पाण्यावरून आता सोलापूर जिल्ह्यात राजकीय संघषार्ची ठिणगी पडली आहे. एका बाजूला आमदार रोहित पवार यांनी उजनी धरण परिसरातील प्रस्तावित प्रकल्पांमुळे शेतकरी, मच्छीमार आणि पर्यावरण धोक्यात येण्याची भीती व्यक्त करीत रस्त्यावर उतरण्याचा इशारा दिला आहे, तर दुसऱ्या बाजूला सोलापूर शहर मध्यचे आमदार देवेंद्र कोठे यांनी राज्य शासनाच्या २८ मुद्द्यांच्या स्पष्टीकरणाचा आधार घेत या प्रकल्पांचे समर्थन केले आहे. त्यामुळे उजनीच्या पाण्याचा प्रश्न आता केवळ तांत्रिक किंवा पर्यावरणीय राहिलेला नसून तो जिल्ह्याच्या राजकीय आणि आर्थिक भवितव्याचा केंद्रबिंदू बनला आहे.

रोहित पवारांचा सवाल : उजनीचे पाणी उद्योगांना की शेतकऱ्यांना?

उजनी धरण परिसरात एआय डेटा सेंटर, फ्लोटिंग सोलर, ग्रीन हायड्रोजन आणि लघु अणुऊर्जा प्रकल्पांच्या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर नैसर्गिक साधनसंपत्तीचा वापर होण्याची शक्यता असल्याचे सांगत रोहित पवार यांनी सरकारला लक्ष्य केले आहे. त्यांच्या दाव्यानुसार, डेटा सेंटरसाठी सुमारे सहा टीएमसी, तर अणुऊर्जा प्रकल्पासाठी सुमारे तीन टीएमसी पाण्याची आवश्यकता भासू शकते. या दोन प्रकल्पांसाठी नऊ टीएमसी पाण्याचा प्रश्न निर्माण होत असेल, तर दुष्काळी परिस्थितीत शेतकऱ्यांच्या सिंचनाचे काय, असा त्यांचा सवाल आहे. उजनीच्या पाण्यावर सुमारे साडेपाच लाख शेतकरी आणि ३० हजार मच्छीमार कुटुंबांचे अर्थकारण अवलंबून असल्याचा दावा त्यांनी केला आहे. तरंगत्या सौरऊर्जा प्रकल्पामुळे जलाशयातील जैवविविधता, माशांचे प्रजनन आणि पारंपरिक मासेमारीवर परिणाम होण्याची शक्यता त्यांनी व्यक्त केली आहे. स्थानिकांचा विरोध डावलून प्रकल्प लादण्याचा प्रयत्न झाल्यास तो खपवून घेतला जाणार नाही, असा इशाराही त्यांनी दिला आहे. याच भूमिकेतून शनिवार, ३१ ऑक्टोबर रोजी सकाळी दहा वाजता उजनी पुलाजवळील रांजणी चौकात रास्ता रोको आंदोलनाची हाक देण्यात आली आहे.

देवेंद्र कोठेंचा प्रतिवाद : ९१ टक्के जलक्षेत्र खुलेच राहणार!

रोहित पवार यांच्या आक्षेपांना उत्तर देताना आमदार देवेंद्र कोठे यांनी ३० ऑक्टोबर रोजी शासनाने प्रसिद्ध केलेल्या २८ मुद्द्यांच्या जाहीर प्रकटनाचा आधार घेतला आहे. उजनीच्या एकूण जलक्षेत्रापैकी केवळ नऊ टक्के क्षेत्रावर फ्लोटिंग सोलर प्रकल्प प्रस्तावित असून उर्वरित ९१ टक्के जलक्षेत्र खुले राहणार असल्याचे त्यांनी म्हटले आहे. या प्रकल्पातून दोन हजार मेगावॅट सौरऊर्जा निर्मितीचे उद्दिष्ट असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कोठे यांच्या मते, प्रकल्पासाठी दरवर्षी केवळ ०.४२ टीएमसी आणि कमाल ०.५ टीएमसी पाण्याची आवश्यकता आहे. विद्यमान पाणीवाटपात कपात केली जाणार नसल्याचे शासनाने स्पष्ट केले आहे. मग नऊ टीएमसी पाण्याची गरज असल्याचा दावा नेमका कोणत्या प्रकल्पाच्या आणि कोणत्या आराखड्याच्या आधारे केला जात आहे, हा प्रश्न आता चर्चेत आला आहे.

ग्रीन हायड्रोजन आणि अणुऊर्जा प्रकल्पावरून वेगळे दावे

या संघषार्तील सर्वाधिक महत्त्वाचा मुद्दा म्हणजे ग्रीन हायड्रोजन आणि अणुऊर्जा प्रकल्प. रोहित पवार यांनी या प्रकल्पांमुळे पाण्याचा वापर आणि पर्यावरणीय सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. दुसरीकडे, देवेंद्र कोठे यांनी शासनाच्या स्पष्टीकरणाचा हवाला देत ग्रीन हायड्रोजन प्रकल्प प्रस्तावित आराखड्यातून वगळण्यात आल्याचे आणि स्मॉल मॉड्युलर रिॲक्टर अर्थात अणुऊर्जा प्रकल्प प्रस्तावित नसल्याचे म्हटले आहे.

म्हणजेच दोन्ही नेत्यांच्या दाव्यांमध्ये केवळ आकड्यांचा नव्हे, तर प्रत्यक्षात कोणते प्रकल्प प्रस्तावित आहेत, (पान 2 वर..)

डॉ. सुभाष कन्नी यांच्या ‘रावण’ चित्रपटातील दोन प्रेरणादायी गाणी प्रदर्शित

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- पौराणिक कथानक, दमदार संगीत आणि आधुनिक कृत्रिम बुद्धिमत्ता (AI) तंत्रज्ञानाचा अनोखा संगम असलेल्या ‘RAAVAN - THE RISE BEFORE THE FALL’ या आगामी हिंदी पौराणिक ॲक्शन थ्रिलर चित्रपटातील ‘जो हारने से डर गया’ आणि ‘चलते रहेंगे’ ही दोन प्रेरणादायी गाणी प्रदर्शित करण्यात आली. या गाण्यांतील प्रभावी शब्दरचना, संगीताचा जोश आणि संघषार्तून उभारी देणारा संदेश यामुळे संगीतप्रेमींमध्ये उत्सुकता निर्माण झाली आहे.

P S MOTION REELS आणि SiDDHA ARTS प्रस्तुत या चित्रपटातील गाण्यांचा विशेष प्रकाशन सोहळा २९ ऑक्टोबर रोजी चित्रपटाचे लेखक-दिग्दर्शक डॉ. सुभाष कन्नी यांच्या जन्मगावी सोलापुरातील जमश्री सिटी येथील कॉनप्लेक्स सिनेमा येथे उत्साहात पार पडला. सोलापूर फिल्म सोसायटीचे अध्यक्ष डॉ. नवनीत तोष्णीवाल आणि चित्रपट निमार्ते डॉ. नितीन तोष्णीवाल यांच्या हस्ते या गाण्यांचे प्रकाशन करण्यात आले.

या कार्यक्रमाला काँग्रेसचे नेते विजयकुमार हत्तुरे, इंटरनॅशनल ह्युमन राइट्स कमिशनच्या उपसंचालिका अनिता कोडमूर तसेच गिनीज वर्ल्ड रेकॉर्डमध्ये नोंद असलेले आदित्य कोडमूर यांची विशेष उपस्थिती होती.

जिद्द, संघर्ष आणि आत्मविश्वासाचा संगीताविष्कार

चित्रपटातील ‘जो हारने से डर गया’ हे गाणे धैर्य, आत्मविश्वास आणि जिद्दीचा प्रभावी आविष्कार आहे. आयुष्यात कितीही मोठी संकटे आली किंवा पराभव समोर उभा ठाकला, तरी त्याला न घाबरता धैर्याने सामोरे जाण्याची प्रेरणा या गाण्यातून देण्यात आली आहे. तर ‘चलते रहेंगे’ हे गाणे संघर्ष, आशा, चिकाटी आणि ध्येयपूर्तीसाठी अखंड प्रयत्न करत राहण्याचा संदेश देते. परिस्थिती कितीही प्रतिकूल असली, तरी थांबायचे नाही, पुढे चालत राहायचे, हा या गाण्याचा मूलभूत विचार आहे.

विशेष म्हणजे, या दोन्ही गाण्यांचे मूळ गीतलेखन आणि संगीत दिग्दर्शन डॉ. सुभाष कन्नी यांनीच केले आहे. गाण्यांच्या गायननिर्मितीसाठी अक तंत्रज्ञानाची मदत घेण्यात आली आहे. पारंपरिक सर्जनशीलतेला आधुनिक तंत्रज्ञानाची जोड देत संगीतनिर्मितीचा नवा प्रयोग त्यांनी केला आहे.

(पान 2 वर..)

संपादकीय

निवडणूक आयोगावर प्रश्न विचारणे अराजकता नव्हे, लोकशाहीचे संरक्षण!

ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीपासून मतदार याद्यांतील संशयास्पद बदलांपर्यंत अनेक प्रश्न अनुत्तरित; विरोधकांच्या आवाजाला देशविरोधी ठरवण्याऐवजी सरकारने पारदर्शक उत्तरे द्यावीत!

लोकशाहीमध्ये निवडणूक ही केवळ सत्तेवर येण्याची प्रक्रिया नसते, तर जनतेच्या विश्वासाचा तो सर्वात महत्त्वाचा आधार असतो. त्यामुळे निवडणूक आयोगाच्या निष्पक्षतेवर प्रश्न उपस्थित होणे ही लोकशाहीसाठी धोक्याची बाब असली, तरी त्या प्रश्नांची उत्तरे मागणे हा नागरिकांचा घटनात्मक अधिकार आहे. मात्र, आज देशात निवडणूक आयोगाच्या कार्यपद्धतीवर प्रश्न विचारणाऱ्यांनाच अराजकतावादी, देशविरोधी किंवा लोकशाहीविरोधी ठरवण्याचा प्रयत्न होताना दिसत आहे. हा प्रकार लोकशाहीच्या मूलभूत मूल्यांनाच छेद देणारा आहे.

मुख्य निवडणूक आयुक्त ज्ञानेश कुमार यांच्या राजीनाम्याची मागणी विरोधी पक्षांकडून होत असताना भाजपकडून त्यांचे समर्थन करण्यासाठी एवढी आक्रमक भूमिका का घेतली जात आहे, हा प्रश्न उपस्थित होणे स्वाभाविक आहे. ज्ञानेश कुमार यांच्या नियुक्तीच्या प्रक्रियेत सर्वोच्च न्यायालयाच्या सरन्यायाधीशांना निवड समितीतून वगळून केंद्रीय मंत्र्यांचा समावेश करण्यात आला. परिणामी, पंतप्रधान नरेंद्र मोदी आणि गृहमंत्री अमित शहा यांच्या बहुमताने झालेल्या नियुक्तीच्या पारदर्शकतेबाबत सुरुवातीपासूनच प्रश्न उपस्थित झाले. त्यानंतर निवडणूक आयुक्तांना कायदेशीर संरक्षण देणाऱ्या तरतुदींमुळे या शंकांना आणखी खतपाणी मिळाले. एखाद्या घटनात्मक पदावरील व्यक्तीला इतक्या विशेष संरक्षणाची गरज का भासावी, याचे उत्तर सरकारने देणे अपेक्षित आहे.

निवडणूक आयोग ही सत्ताधारी पक्षाच्या सोयीसाठी काम करणारी संस्था नसून ती संपूर्ण देशाच्या लोकशाहीची संरक्षक संस्था आहे. तिच्यावरील विश्वास टिकवणे ही सरकारची जबाबदारी आहे. विरोधकांनी उपस्थित केलेले प्रत्येक प्रश्न चुकीचेच आहेत, असे गृहीत धरून चालणार नाही. त्याचप्रमाणे विरोधकांचे आरोप म्हणजे अंतिम सत्य असेही मानता येणार नाही. मात्र, आरोपांची सत्यता तपासण्याऐवजी प्रश्न विचारणाऱ्यांनाच लक्ष्य केले जात असेल, तर संशय अधिक गडद होतो.

मतदार याद्यांमधील वाढ, दुबार नावे, अचानक वगळली जाणारी नावे आणि विशेष सखोल पुनरीक्षण अर्थात एसआयआर प्रक्रियेतील त्रुटी हे आजच्या लोकशाहीसमोरील गंभीर प्रश्न आहेत. महाराष्ट्रात लोकसभा आणि विधानसभा निवडणुकांदरम्यान अवघ्या पाच महिन्यांत ४१ लाख मतदारांची वाढ झाल्याचा मुद्दा राहुल गांधी यांनी उपस्थित केला. त्यातील चार दिवसांत झालेली लाखोंची वाढही चर्चेचा विषय ठरली. बिहारमध्ये एसआयआर प्रक्रियेदरम्यान ६८ लाख मतदारांची नावे वगळण्यात आल्याचा मुद्दा समोर आला. पश्चिम बंगालमध्येही वगळलेल्या मतदारांच्या पात्रतेबाबत प्रश्न निर्माण झाले. या सर्व बाबींची निष्पक्ष आणि पारदर्शक चौकशी होणे आवश्यक आहे. मतदार यादीतील एका पात्र नावाचे महत्त्वही लोकशाहीत कमी नाही. कारण मतदाराचे नाव वगळले जाणे म्हणजे केवळ कागदावरील नोंद कमी होणे नव्हे, तर त्या नागरिकाचा मतदानाचा अधिकार हिरावला जाणे होय.

निवडणूक प्रक्रियेत तांत्रिक यंत्रणांचा वापर होत असेल, तर त्या यंत्रणांची कार्यपद्धतीही सार्वजनिक तपासणीसाठी खुली असली पाहिजे. ईसीआयनेट सॉफ्टवेअर, फॉर्म क्रमांक सात, मतदारांची नावे वगळण्याचे अधिकार आणि संबंधित सॉफ्टवेअर पुरवणाऱ्या कंपन्यांची माहिती याबाबत पारदर्शकता असणे गरजेचे आहे. निवडणुकीच्या विश्वासार्हतेचा प्रश्न निर्माण होत असताना माहिती लपवण्यापेक्षा ती जनतेसमोर ठेवणे अधिक हिताचे आहे.

याहून महत्त्वाची बाब म्हणजे भाजपचा स्वतःचा राजकीय इतिहास. तत्कालीन मुख्य निवडणूक आयुक्त नवीन चावला यांच्यावर काँग्रेसशी जवळीक असल्याचा आरोप करत लालकृष्ण अडवाणी यांच्या नेतृत्वाखाली भाजपने राजीनाम्याची मागणी केली होती. निवडणूक आयोगाच्या निर्णयाविरोधात भाजपने आंदोलनेही केली होती. तेव्हा भाजपला लोकशाहीची चिंता होती आणि आज विरोधकांनी निवडणूक आयोगाला प्रश्न विचारले की ती अराजकता ठरते, हा दुटप्पीपणा नाही काय? सत्तेत असताना विरोधकांच्या आंदोलनांना लोकशाहीचा अधिकार मानायचा आणि विरोधात आंदोलन झाले की त्याला देशविरोधी रंग द्यायचा, ही भूमिका लोकशाहीला शोभणारी नाही.

मुख्यमंत्र्यांनी आपल्या लेखातून 'रिजिम चेंज'चा मुद्दा उपस्थित करत आंदोलनकर्त्यांना अराजकतावादी ठरवण्याचा प्रयत्न केला आहे. परंतु लोकशाहीमध्ये सरकार बदलणे आणि व्यवस्थेतील त्रुटींविरोधात आंदोलन करणे या दोन वेगळ्या गोष्टी आहेत. शांततापूर्ण आंदोलन म्हणजे राजवट उलथवण्याचा कट नव्हे. सरकारवर टीका करणे, घटनात्मक संस्थांना जाब विचारणे आणि प्रशासनाकडून उत्तरांची मागणी करणे हे लोकशाहीचे अविभाज्य भाग आहेत. अण्णा हजारे यांच्या नेतृत्वाखाली काँग्रेसप्रणीत यूपीए सरकारविरोधात झालेल्या आंदोलनाला त्यावेळी भाजपनेही पाठिंबा दिला होता. तेव्हा आंदोलन लोकशाहीचे प्रतीक होते, तर आज तेच आंदोलनाचे हत्यार विरोधकांच्या हातात असल्याने अराजकता कशी ठरू शकते?

लोकशाहीमध्ये सत्ताधाऱ्यांना प्रश्न विचारणारा विरोधी पक्ष हा शत्रू नसतो, तर तो लोकशाही व्यवस्थेतील आवश्यक घटक असतो. राहुल गांधी यांनी उपस्थित केलेल्या प्रश्नांची उत्तरे देण्याऐवजी त्यांच्या विधानांवर आक्षेप घेणे, त्यांना शपथपत्राची अट घालणे किंवा कारवाईच्या धमक्या देणे यातून प्रश्न सुटणार नाहीत. आरोप चुकीचे असतील, तर ते तथ्यांच्या आधारे खोडून काढावेत. निवडणूक आयोगाची भूमिका निष्पक्ष असेल, तर त्यासाठी पारदर्शक पुरावे सादर करण्यास कोणतीही हरकत असण्याचे कारण नाही.

आज देशासमोर खरी कसोटी सत्ताधाऱ्यांच्या लोकप्रियतेची नाही, तर लोकशाही संस्थांच्या विश्वासार्हतेची आहे. निवडणूक आयोग, न्यायव्यवस्था, संसद आणि इतर घटनात्मक संस्था या कोणत्याही राजकीय पक्षाच्या मालकीच्या नाहीत. त्या देशाच्या जनतेच्या आहेत. त्यांच्यावर प्रश्न उपस्थित करणे म्हणजे संस्थांचा अवमान नव्हे; उलट त्या संस्था अधिक सक्षम आणि उत्तरदायी बनवण्याचा तो प्रयत्न आहे.

शांततापूर्ण आंदोलने करणाऱ्यांवर बळाचा वापर, आंदोलकांना गुन्हेगारांप्रमाणे वागणूक आणि विरोधी आवाज दडपण्याचे प्रयत्न लोकशाहीच्या आरोग्यासाठी घातक आहेत. लोकशाही केवळ निवडणुकांपुरती मर्यादित नाही. ती मतभिन्नतेचा आदर, अभिव्यक्तिस्वातंत्र्य, निष्पक्ष संस्था आणि सत्तेला जाब विचारण्याच्या अधिकारावर उभी असते.

लोकशाहीत सरकार जनतेमुळे असते; जनता सरकारमुळे नसते. त्यामुळे सरकारला प्रश्न विचारणे हा गुन्हा नाही आणि निवडणूक आयोगाला जाब विचारणे ही अराजकताही नाही. उलट, लोकशाहीच्या रक्षणासाठी जागरूक नागरिकांनी आवाज उठवणे ही काळाची गरज आहे. सत्ताधाऱ्यांनी विरोधकांच्या आवाजाला अराजकतेचे नाव देण्याऐवजी मतदारांच्या मनातील प्रश्नांना उत्तरे द्यावीत. कारण लोकशाहीचे खरे सामर्थ्य विरोधकांना गप्प करण्यात नसून, विरोधी आवाज ऐकून घेण्याच्या सत्ताधाऱ्यांच्या क्षमतेत असते!

राष्ट्रीय एकता : विविधतेतील एकात्मतेचा संकल्प

भारत हा विविधतेने नटलेला, सांस्कृतिक समृद्धीचा प्रदीर्घ वारसा लाभलेला आणि लोकशाही मूल्यांवर आधारित राष्ट्र आहे. या देशाची खरी ओळख केवळ त्याच्या भौगोलिक विस्तारात किंवा लोकसंख्येत नाही, तर विविध भाषा, धर्म, जाती, पंथ, संस्कृती, परंपरा आणि जीवनपद्धती यांना सामावून घेणाऱ्या सामाजिक रचनेत आहे. हिमालयाच्या उत्तुंग पर्वतरांगांपासून कन्याकुमारीच्या समुद्रकिनाऱ्यापर्यंत आणि राजस्थानच्या वाळवंटी प्रदेशापासून ईशान्य भारतातील हिरव्यागार डोंगराळ भागांपर्यंत प्रत्येक प्रदेशाचे स्वतंत्र भौगोलिक, सांस्कृतिक आणि सामाजिक वैशिष्ट्य आहे. प्रत्येक राज्याची भाषा, लोककला, खाद्यसंस्कृती, वेशभूषा आणि सण-उत्सव वेगवेगळे असले, तरी या सर्वांना जोडणारा समान धागा म्हणजे भारतीयत्व. विविधतेचा स्वीकार करून परस्परांविषयी आदर, विश्वास, सहकार्य आणि बंधुभाव निर्माण करणे म्हणजे राष्ट्रीय एकता होय. राष्ट्रीय एकता ही केवळ भावनिक संकल्पना नसून देशाच्या सामाजिक स्थैर्याचा, लोकशाहीच्या बळकटीकरणाचा आणि सर्वांगीण विकासाचा मूलभूत आधार आहे.

दरवर्षी ३१ ऑक्टोबर हा दिवस भारतात राष्ट्रीय एकता दिन म्हणून साजरा केला जातो. सरदार वल्लभभाई पटेल यांच्या जयंतीनिमित्त हा दिवस राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश देण्यासाठी पाळला जातो. स्वातंत्र्यानंतर भारताच्या एकीकरणामध्ये त्यांनी महत्त्वपूर्ण योगदान दिले. तथापि, या दिवसाचे महत्त्व केवळ एका ऐतिहासिक व्यक्तिमत्त्वाच्या कार्याचे स्मरण करण्यापुरते मर्यादित नाही. आजच्या बदलत्या सामाजिक, आर्थिक आणि राजकीय परिस्थितीत देशाची एकता टिकविणे, सामाजिक सलोखा वाढविणे आणि नागरिकांमध्ये राष्ट्रीय जबाबदारीची जाणीव निर्माण करणे ही या दिवसाची व्यापक उद्दिष्टे आहेत. देशाची अखंडता टिकविण्यासाठी केवळ भौगोलिक सीमा सुरक्षित असणे पुरेसे नाही, तर देशातील नागरिकांची मने एकमेकांशी जोडलेली असणेही तितकेच आवश्यक आहे. म्हणूनच राष्ट्रीय एकता दिन हा प्रत्येक भारतीयाला आपल्या सामूहिक जबाबदारीची जाणीव करून देणारा दिवस आहे.

राष्ट्रीय एकता म्हणजे सर्वांनी एकाच भाषेत बोलणे, एकाच धर्माचे पालन करणे किंवा एकसारखी जीवनशैली स्वीकारणे नव्हे. प्रत्येक व्यक्तीला आपली भाषा, धर्म, संस्कृती, परंपरा आणि विचार जपण्याचे स्वातंत्र्य असतानाही इतरांच्या वेगळेपणाचा आदर करून देशाच्या व्यापक हितासाठी एकत्र येणे म्हणजे राष्ट्रीय एकता. विविधतेचा नाश करून एकरूपता निर्माण करणे हा एकतेचा मार्ग नाही. उलट, विविधतेचे जतन करून समान राष्ट्रीय भावना विकसित करणे हा खऱ्या एकात्मतेचा आधार आहे. भारतीय समाजातील प्रत्येक घटकाचे स्वतंत्र अस्तित्व आणि योगदान महत्त्वाचे आहे. त्यामुळे कोणत्याही भाषा, धर्म, जात किंवा प्रदेशाला श्रेष्ठ अथवा कनिष्ठ मानण्याची प्रवृत्ती टाळली पाहिजे. प्रत्येक नागरिकाला भारतीय म्हणून समान सन्मान मिळणे आणि देशाच्या विकासात सहभागी होण्याची संधी उपलब्ध होणे आवश्यक आहे. विविधतेचा आदर आणि समानतेचा आग्रह या दोन्ही गोष्टी एकत्र आल्या, तरच राष्ट्रीय एकतेची संकल्पना प्रत्यक्षात साकार होऊ शकते.

भारतीय स्वातंत्र्यलढा हा राष्ट्रीय एकतेच्या सामर्थ्याचे प्रभावी उदाहरण आहे. देशाच्या विविध भागांतील लोकांनी स्वातंत्र्याच्या समान ध्येयासाठी आपापले प्रादेशिक, भाषिक, धार्मिक आणि सामाजिक भेद बाजूला ठेवून संघर्ष केला. शेतकरी, कामगार, विद्यार्थी, महिला, आदिवासी, सामाजिक कार्यकर्ते आणि सामान्य नागरिक यांनी या चळवळीत सहभाग घेतला. वेगवेगळ्या भाषा बोलणारे, वेगवेगळ्या धर्मांचे आणि सामाजिक पार्श्वभूमीचे लोक एका राष्ट्रीय उद्दिष्टासाठी एकत्र आले. या सामूहिक सहभागामुळे स्वातंत्र्याची चळवळ व्यापक झाली. या इतिहासातून एक महत्त्वाचा संदेश मिळतो की समाजातील विविध घटकांमध्ये परस्परविश्वास आणि सहकार्याची भावना निर्माण झाली, तर मोठी राष्ट्रीय उद्दिष्टे साध्य करणे शक्य होते. स्वातंत्र्यानंतरही देशाच्या विकासासाठी, लोकशाहीच्या संरक्षणासाठी आणि सामाजिक न्यायाच्या प्रस्थापनेसाठी याच एकजुटीची आवश्यकता आहे.

भारतीय संविधान हे राष्ट्रीय एकतेचे सर्वात महत्त्वाचे अधिष्ठान आहे. संविधानाच्या उद्देशिकेत न्याय, स्वातंत्र्य, समता आणि बंधुता या मूल्यांचा समावेश करण्यात आला आहे. ही मूल्ये केवळ कायदेशीर तरतुदी नसून भारतीय समाजाला एकत्र बांधणारी जीवनमूल्ये आहेत. प्रत्येक नागरिकाला सामाजिक, आर्थिक आणि राजकीय न्याय मिळावा, विचार व अभिव्यक्तीचे स्वातंत्र्य लाभावे, संधींची समानता उपलब्ध व्हावी आणि व्यक्तीची प्रतिष्ठा जपत बंधुभाव वाढावा, हा संविधानाचा व्यापक दृष्टिकोन आहे. संविधानाने सर्व नागरिकांना समान नागरिकत्व दिले आहे. त्यामुळे कोणत्याही व्यक्तीचे स्थान तिच्या जातीवर, धर्मावर, भाषेवर, लिंगावर किंवा जन्मस्थानावरून ठरत नाही. प्रत्येक नागरिक हा राष्ट्राचा समान घटक आहे, ही जाणीव राष्ट्रीय एकतेला बळ देते. संविधानातील मूल्यांचे पालन करणे ही केवळ शासनाची जबाबदारी नसून प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे.

भारतीय समाजात आजही जातिभेद आणि सामाजिक विषमता ही राष्ट्रीय एकतेसमोरील गंभीर आव्हाने आहेत. जातीच्या आधारावर माणसामाणसांत भेदभाव करणे, सामाजिक प्रतिष्ठा नाकारणे, सार्वजनिक ठिकाणी समान वागणूक न देणे किंवा विशिष्ट समाजघटकांना विकासाच्या संधींपासून वंचित ठेवणे या प्रवृत्ती समाजात दुरावा निर्माण करतात. सामाजिक एकता टिकविण्यासाठी प्रत्येक व्यक्तीला समान सन्मान आणि समान संधी मिळणे आवश्यक आहे. अस्पृश्यता, जातीय अहंकार, सामाजिक बहिष्कार आणि भेदभाव यांना आधुनिक लोकशाही समाजात स्थान असू शकत नाही. महात्मा ज्योतिराव फुले, क्रांतिज्योती सावित्रीबाई फुले, राजर्षी शाहू महाराज आणि डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांसारख्या समाजसुधारकांनी सामाजिक विषमतेविरुद्ध संघर्ष करून समताधिष्ठित समाजनिर्मितीचा विचार मांडला. त्यांच्या विचारांचा स्वीकार करणे म्हणजे सामाजिक बंधुभाव आणि राष्ट्रीय एकता अधिक दृढ करणे होय. समाजातील प्रत्येक घटकाला सन्मानाने जगता येईल, अशी परिस्थिती निर्माण झाली तरच एकात्मतेची भावना वास्तवात उतरू शकते.

धार्मिक विविधता हे भारताच्या सामाजिक जीवनाचे महत्त्वाचे वैशिष्ट्य आहे. हिंदू, बौद्ध, मुस्लिम, ख्रिश्चन, शीख, जैन, पारशी आणि इतर धार्मिक समुदायांचे लोक या देशात एकत्र राहतात. प्रत्येक धर्माची स्वतंत्र श्रद्धा, उपासना पद्धती, सण, उत्सव आणि सांस्कृतिक परंपरा आहेत. या विविधतेमुळे भारतीय समाजाचे सांस्कृतिक जीवन समृद्ध झाले आहे. मात्र धर्माच्या नावावर द्वेष निर्माण करणे, अफवा पसरविणे, धार्मिक भावना भडकविणे किंवा एका समुदायाला दुसऱ्या समुदायाच्या विरोधात उभे करणे या गोष्टी राष्ट्रीय एकतेस बाधा आणतात. प्रत्येक व्यक्तीला स्वतःच्या धर्माचे पालन करण्याचे स्वातंत्र्य असले पाहिजे आणि त्याच वेळी इतरांच्या श्रद्धांचा आदर करण्याची जबाबदारीही स्वीकारली पाहिजे. धार्मिक सहिष्णुता म्हणजे केवळ दुसऱ्याच्या श्रद्धेला सहन करणे नव्हे, तर त्याच्या अस्तित्वाचा आणि अधिकारांचा सन्मान करणे होय. विविध धार्मिक समुदायांतील नागरिकांनी परस्परांच्या सण-उत्सवांत सहभागी होणे, सामाजिक कार्यात सहकार्य करणे आणि संकटाच्या वेळी एकमेकांच्या मदतीला धावून जाणे यातून राष्ट्रीय एकतेची भावना अधिक दृढ होते.

भाषिक विविधता ही भारतीय समाजाची आणखी एक महत्त्वाची ओळख आहे. भारतात अनेक भाषा आणि बोलीभाषा बोलल्या जातात. प्रत्येक भाषेला स्वतःचा इतिहास, साहित्यिक परंपरा, लोकसाहित्य आणि सांस्कृतिक वारसा आहे. मातृभाषा ही व्यक्तीच्या भावविश्वाशी आणि सांस्कृतिक ओळखीशी जोडलेली असते. त्यामुळे प्रत्येक भाषेचा सन्मान राखणे आवश्यक आहे. एखाद्या भाषेला श्रेष्ठ आणि दुसऱ्या भाषेला कनिष्ठ मानण्याची प्रवृत्ती भाषिक दुरावा निर्माण करू शकते. राष्ट्रीय एकतेसाठी भाषिक विविधतेचा स्वीकार आणि परस्परांच्या भाषांविषयी आदर आवश्यक आहे. विविध भारतीय भाषा शिकण्याची संधी उपलब्ध करून दिल्यास वेगवेगळ्या प्रदेशांतील नागरिकांमधील संवाद वाढू शकतो. साहित्य, नाटक, चित्रपट, लोककला आणि सांस्कृतिक देवाणघेवाण यांच्या माध्यमातून भाषिक बंध अधिक दृढ करता येतात. स्वतःच्या मातृभाषेचा अभिमान बाळगताना इतर भाषांचाही सन्मान करणे ही राष्ट्रीय एकात्मतेची महत्त्वाची खूण आहे.

प्रादेशिक विविधतेचाही राष्ट्रीय एकतेशी जवळचा संबंध आहे. भारतातील प्रत्येक राज्याची भौगोलिक परिस्थिती, आर्थिक रचना, लोकजीवन आणि सांस्कृतिक परंपरा वेगवेगळ्या आहेत. महाराष्ट्राची संतपरंपरा, सामाजिक सुधारणांचा वारसा, सहकार चळवळ आणि लोककला यांना विशेष महत्त्व आहे. पंजाबची शौर्यपरंपरा, बंगालचे साहित्यिक योगदान, दक्षिण भारताची प्राचीन सांस्कृतिक परंपरा, ईशान्य भारतातील आदिवासी संस्कृती आणि राजस्थानची लोकपरंपरा अशा अनेक वैशिष्ट्यांनी भारतीय समाज समृद्ध झाला आहे. या प्रादेशिक वैशिष्ट्यांचा आदर राखून राष्ट्रीय स्तरावर परस्पर सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. एका राज्यातील नागरिकांनी दुसऱ्या राज्यातील लोकांकडे परकेपणाने पाहण्याऐवजी त्यांना समान राष्ट्रीय समुदायाचे घटक म्हणून स्वीकारले पाहिजे. शिक्षण, रोजगार किंवा व्यवसायानिमित्त दुसऱ्या राज्यात स्थलांतरित झालेल्या नागरिकांना सन्मानाने वागविणे ही राष्ट्रीय एकतेची प्रत्यक्ष कसोटी आहे.

राष्ट्रीय एकतेच्या प्रक्रियेत आदिवासी आणि दुर्गम भागांतील समाजघटकांचा सहभाग विशेष महत्त्वाचा आहे. आदिवासी समुदायांची भाषा, संस्कृती, लोकपरंपरा, पर्यावरणविषयक ज्ञान आणि जीवनपद्धती भारतीय सांस्कृतिक वारशाचा अविभाज्य भाग आहेत. वारली, भिल्ल, कोकणा, गोंड, संथाल आणि इतर अनेक आदिवासी समुदायांनी देशाच्या सांस्कृतिक समृद्धीत मोलाचे योगदान दिले आहे. मात्र अनेक आदिवासी भागांत शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांच्या उपलब्धतेबाबत आजही अडचणी आहेत. विकासाच्या प्रक्रियेत त्यांना समान संधी मिळणे, त्यांच्या जमिनी, भाषा, संस्कृती आणि परंपरांचे संरक्षण होणे आवश्यक आहे. आदिवासी समाजाला विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेताना त्यांच्या स्वतंत्र सांस्कृतिक ओळखीचा आदर केला पाहिजे. विकासाच्या संधींपासून कोणताही समाजघटक वंचित राहिल्यास राष्ट्रीय एकतेची भावना कमकुवत होऊ शकते. म्हणूनच समावेशक विकास हा राष्ट्रीय एकात्मतेचा महत्त्वाचा आधार आहे.

आर्थिक विषमता ही राष्ट्रीय एकतेसमोरील आणखी एक मोठी समस्या आहे. देशाच्या विकासाचा लाभ समाजातील सर्व घटकांपर्यंत समानतेने पोहोचला नाही, तर सामाजिक असंतोष आणि दुरावा वाढण्याची शक्यता असते. ग्रामीण आणि शहरी भागांतील विकासातील अंतर, शेतकरी आणि शेतमजुरांच्या समस्या, बेरोजगारी, गरिबी, शिक्षणातील असमानता आणि आरोग्यसेवांची अपुरी उपलब्धता यांचा समाजाच्या एकात्मतेवर परिणाम होतो. एका बाजूला आधुनिक तंत्रज्ञान आणि औद्योगिक विकास झपाट्याने होत असताना दुसऱ्या बाजूला अनेक नागरिकांना मूलभूत गरजांसाठी संघर्ष करावा लागतो. त्यामुळे आर्थिक विकासाचे उद्दिष्ट केवळ राष्ट्रीय उत्पन्न वाढविण्यापुरते मर्यादित न ठेवता सर्वसामान्यांच्या जीवनमानात सुधारणा घडविणे हे असले पाहिजे. रोजगारनिर्मिती, गुणवत्तापूर्ण शिक्षण, परवडणाऱ्या आरोग्यसेवा, ग्रामीण विकास आणि सामाजिक सुरक्षा यांना प्राधान्य दिल्यास समाजातील विविध घटकांमध्ये विश्वास निर्माण होईल.

महिलांचा सन्मान, सुरक्षितता आणि समान सहभाग यांशिवाय राष्ट्रीय एकतेची संकल्पना पूर्ण होऊ शकत नाही. देशाच्या सामाजिक, आर्थिक, राजकीय, शैक्षणिक आणि सांस्कृतिक विकासात महिलांचे योगदान अत्यंत महत्त्वाचे आहे. तरीही लिंगभेद, कौटुंबिक हिंसा, बालविवाह, शिक्षणातील अडथळे, रोजगारातील असमानता आणि सार्वजनिक जीवनातील असुरक्षितता यांसारख्या समस्या अस्तित्वात आहेत. महिलांना समान संधी, निर्णयप्रक्रियेत सहभाग, आर्थिक स्वावलंबन आणि प्रतिष्ठेचे जीवन मिळणे आवश्यक आहे. स्त्री-पुरुष समानतेचा विचार घरापासून शाळेपर्यंत आणि कार्यस्थळापासून सार्वजनिक संस्थांपर्यंत रुजला पाहिजे. समाजातील निम्म्या लोकसंख्येला समान अधिकार आणि संधी नाकारून राष्ट्रीय प्रगती साधता येणार नाही. महिलांच्या नेतृत्वाला प्रोत्साहन देणे आणि त्यांच्या क्षमतांचा विकास करणे ही राष्ट्रीय एकतेचीही गरज आहे.

राष्ट्रीय एकतेच्या जडणघडणीत शिक्षणाची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. शिक्षण केवळ ज्ञान आणि कौशल्ये देत नाही, तर व्यक्तीच्या विचारांना व्यापकता आणि सामाजिक जाणीवही प्रदान करते. शाळा, महाविद्यालये आणि विद्यापीठांमध्ये संविधानिक मूल्ये, सामाजिक समता, लोकशाही, मानवी हक्क, पर्यावरणीय जबाबदारी आणि विविधतेचा आदर यांविषयी विद्यार्थ्यांना समज दिली पाहिजे. विद्यार्थ्यांनी वेगवेगळ्या धर्मांचे, भाषा बोलणाऱ्या आणि विविध सामाजिक पार्श्वभूमीतील सहाध्यायांशी संवाद साधावा, एकत्रित उपक्रमांत सहभागी व्हावे आणि परस्परांच्या अनुभवांचा आदर करावा. राष्ट्रीय सण, सांस्कृतिक कार्यक्रम, सामाजिक सेवा आणि युवक उपक्रम यांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांमध्ये सामूहिक जबाबदारीची भावना विकसित करता येते. शिक्षणातून विवेकशील, संवेदनशील आणि जबाबदार नागरिक घडले, तर राष्ट्रीय एकतेचा पाया अधिक मजबूत होईल.

आजच्या डिजिटल युगात समाजमाध्यमे राष्ट्रीय एकतेसाठी संधी आणि आव्हान अशा दोन्ही भूमिका बजावत आहेत. माहिती आणि विचारांची देवाणघेवाण काही क्षणांत देशाच्या कानाकोपऱ्यात पोहोचू शकते. विविध प्रदेशांतील लोकांना एकमेकांच्या संस्कृतीची ओळख करून देणे, सामाजिक प्रश्नांवर चर्चा घडविणे आणि लोकहिताच्या उपक्रमांना पाठिंबा मिळविणे यासाठी डिजिटल माध्यमे उपयुक्त ठरतात. परंतु खोटी माहिती, बनावट छायाचित्रे, दिशाभूल करणारे संदेश, द्वेषपूर्ण भाष्य आणि अफवा यांमुळे समाजात अविश्वास निर्माण होऊ शकतो. विशेषतः धर्म, जात आणि प्रादेशिक ओळख यांच्याशी संबंधित अप्रमाणित माहिती वेगाने पसरल्यास सामाजिक शांततेला धोका निर्माण होतो. त्यामुळे कोणतीही माहिती पुढे पाठविण्यापूर्वी तिची सत्यता तपासणे, विवेकाने प्रतिक्रिया देणे आणि द्वेष पसरविणाऱ्या मजकुरापासून दूर राहणे प्रत्येक नागरिकाची जबाबदारी आहे. डिजिटल साक्षरतेबरोबरच माध्यम साक्षरता विकसित करणे ही आजच्या काळातील राष्ट्रीय एकतेची आवश्यक अट आहे.

राष्ट्रीय एकता आणि राष्ट्रीय सुरक्षा यांचाही परस्परांशी घनिष्ठ संबंध आहे. देशाच्या सीमांचे संरक्षण करण्यासाठी सक्षम संरक्षण व्यवस्था आवश्यक असते; मात्र देशांतर्गत सामाजिक शांतता, नागरिकांमधील विश्वास आणि लोकशाही संस्थांवरील श्रद्धाही तितकीच महत्त्वाची असते. दहशतवाद, फुटीरतावादी प्रवृत्ती, हिंसाचार आणि बाह्य हस्तक्षेप यांसारख्या आव्हानांचा सामना करताना समाजातील एकजूट महत्त्वाची ठरते. नैसर्गिक आपत्ती, महामारी किंवा इतर आणीबाणीच्या परिस्थितीत नागरिकांनी परस्परांना मदत करणे ही राष्ट्रीय एकतेची जिवंत अभिव्यक्ती आहे. पूर, भूकंप, दुष्काळ किंवा इतर संकटांमध्ये मदतीसाठी पुढे येणारे स्वयंसेवक, सामाजिक संस्था, प्रशासन आणि सामान्य नागरिक हे एकात्मतेचे सामर्थ्य दाखवून देतात. संकटाच्या काळात माणुसकीला प्राधान्य देणारा समाजच खऱ्या अर्थाने एकसंघ राहू शकतो.

लोकशाही प्रक्रियेत नागरिकांचा सक्रिय सहभाग राष्ट्रीय एकतेसाठी आवश्यक आहे. मतदान करणे, सार्वजनिक प्रश्नांवर जागरूक राहणे, स्थानिक स्वराज्य संस्थांच्या कामकाजात सहभाग घेणे, कायद्याचे पालन करणे आणि सार्वजनिक संपत्तीचे संरक्षण करणे ही नागरिकांची महत्त्वाची कर्तव्ये आहेत. लोकशाहीमध्ये मतभिन्नतेला स्थान असते. प्रत्येक नागरिकाला आपले मत मांडण्याचा आणि शासनाच्या निर्णयांवर टीका करण्याचा अधिकार आहे. मात्र मतभेद व्यक्त करताना हिंसा, द्वेष किंवा समाजविघातक मार्गांचा अवलंब होऊ नये. विरोधी विचार ऐकून घेणे, तर्कशुद्ध चर्चा करणे आणि लोकशाही मार्गाने मतभेद सोडविणे ही एकात्म समाजाची लक्षणे आहेत. राजकीय पक्ष, सामाजिक संघटना आणि सार्वजनिक नेतृत्व यांनीही समाजात तेढ निर्माण करणाऱ्या भाषेऐवजी संवाद, सहकार्य आणि विकासाचा मार्ग स्वीकारला पाहिजे.

राष्ट्रीय एकतेची सुरुवात प्रत्यक्षात आपल्या घरापासून आणि परिसरापासून होते. कुटुंबात मुलांना समानतेचे संस्कार देणे, शाळेत सर्व विद्यार्थ्यांना समान वागणूक देणे, कामाच्या ठिकाणी भेदभाव टाळणे, सार्वजनिक ठिकाणी इतरांच्या अधिकारांचा आदर करणे आणि सामाजिक कार्यक्रमांत सर्वांना सहभागी करून घेणे या छोट्या कृतींतून एकतेची भावना विकसित होते. आपल्या परिसरात वेगवेगळ्या भाषा बोलणारे, विविध धर्मांचे किंवा वेगळ्या सामाजिक पार्श्वभूमीचे लोक राहत असतील, तर त्यांच्याशी संवाद आणि सहकार्य वाढविणे आवश्यक आहे. एखाद्या व्यक्तीची ओळख तिच्या जातीवर, धर्मावर किंवा भाषेवरून ठरविण्याऐवजी तिच्या माणूसपणाला महत्त्व देणे ही राष्ट्रीय एकतेची खरी सुरुवात आहे. सामाजिक सलोखा हा केवळ सार्वजनिक सभांमधून निर्माण होत नाही; तो दैनंदिन जीवनातील परस्पर सन्मान आणि सहकार्याच्या अनुभवांतून दृढ होतो.

राष्ट्रीय एकता दिनानिमित्त देशभरात एकता दौड, शपथग्रहण, व्याख्याने, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम, शालेय स्पर्धा आणि सामाजिक उपक्रम आयोजित केले जातात. या कार्यक्रमांमधून राष्ट्रीय एकात्मतेचा संदेश दिला जातो. मात्र या उपक्रमांचा प्रभाव एका दिवसापुरता मर्यादित राहू नये. राष्ट्रीय एकतेची शपथ घेतल्यानंतर प्रत्यक्ष जीवनात भेदभाव करणारे वर्तन सुरूच राहिले, तर त्या शपथेचा उपयोग मर्यादित ठरतो. त्यामुळे अशा दिनविशेषांचे औचित्य साधून समाजातील वास्तव समस्यांवर चर्चा होणे, स्थानिक पातळीवर संवादाचे व्यासपीठ निर्माण होणे आणि सामाजिक सलोखा वाढविणारे उपक्रम राबविले जाणे आवश्यक आहे. शाळा, महाविद्यालये, विद्यापीठे, स्वयंसेवी संस्था, स्थानिक स्वराज्य संस्था आणि प्रसारमाध्यमे यांनी या प्रक्रियेत सक्रिय भूमिका बजावली पाहिजे.

भारत आज विज्ञान, तंत्रज्ञान, अंतराळ संशोधन, उद्योग, शेती, शिक्षण, क्रीडा आणि विविध क्षेत्रांत प्रगती करीत आहे. जागतिक पातळीवर देशाची प्रतिष्ठा वाढविण्यासाठी आर्थिक सामर्थ्याबरोबरच सामाजिक स्थैर्य आणि राष्ट्रीय एकात्मताही महत्त्वाची आहे. विकसित राष्ट्र होण्याचे ध्येय साध्य करताना समाजातील शेवटच्या घटकापर्यंत विकासाची फळे पोहोचली पाहिजेत. ग्रामीण, आदिवासी, दुर्गम आणि वंचित भागांतील नागरिकांना विकासाच्या प्रक्रियेत समान स्थान मिळाले पाहिजे. विविधतेचा सन्मान करणारी, सामाजिक न्यायाला प्राधान्य देणारी आणि सर्व नागरिकांना समान संधी उपलब्ध करून देणारी व्यवस्था निर्माण झाली, तर भारताचे राष्ट्रीय सामर्थ्य अधिक व्यापक होईल. देशाची प्रगती ही केवळ काही शहरांची, काही प्रदेशांची किंवा काही विशिष्ट समाजघटकांची प्रगती नसून ती प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडविणारी असली पाहिजे.

राष्ट्रीय एकता ही केवळ भावनिक संकल्पना नाही, तर ती सामाजिक न्याय, लोकशाही, समानता, बंधुता आणि मानवी प्रतिष्ठा यांवर आधारित सामूहिक जीवनपद्धती आहे. एकतेचा अर्थ मतभेद संपविणे नसून मतभेद असूनही एकमेकांशी संवाद साधण्याची क्षमता विकसित करणे हा आहे. विविधतेचा अर्थ विभाजन नसून परस्परांच्या वेगळेपणातून समृद्धी निर्माण करणे हा आहे. धर्म, जात, भाषा, प्रदेश आणि आर्थिक स्थिती यांपलीकडे जाऊन प्रत्येक नागरिकाला समान मानवी प्रतिष्ठा देणे ही राष्ट्रीय एकतेची कसोटी आहे. देशाच्या अखंडतेचे रक्षण करण्यासाठी केवळ सीमांवर जागरूक राहणे पुरेसे नाही; समाजातील मने जोडणे, विषमता कमी करणे आणि परस्परविश्वास वाढविणेही तितकेच आवश्यक आहे.

३१ ऑक्टोबरचा राष्ट्रीय एकता दिन आपल्याला याच व्यापक जबाबदारीची जाणीव करून देतो. या दिनानिमित्त आपण केवळ राष्ट्रीय एकात्मतेच्या घोषणा देऊन थांबू नये, तर आपल्या विचारांत आणि कृतीत समता, सहिष्णुता, बंधुभाव आणि सहकार्याची मूल्ये रुजविण्याचा संकल्प केला पाहिजे. दुसऱ्याच्या भाषेचा, धर्माचा, संस्कृतीचा आणि विचारांचा आदर करणे, अन्याय व भेदभावाविरुद्ध उभे राहणे, अफवांपासून दूर राहणे आणि समाजातील दुर्बल घटकांना विकासाच्या प्रवाहात सहभागी करून घेणे या माध्यमातून राष्ट्रीय एकतेला प्रत्यक्ष बळ देता येईल. भारताची खरी ताकद त्याच्या विविधतेत आहे आणि त्या विविधतेला एकत्र बांधणाऱ्या बंधुभावात आहे. विविधतेचा सन्मान, समानतेचा स्वीकार आणि संविधानिक मूल्यांचे आचरण या त्रिसूत्रीवरच समर्थ, समृद्ध आणि एकसंघ भारताची उभारणी होऊ शकते. राष्ट्रीय एकता ही केवळ एका दिवसाची आठवण न राहता प्रत्येक भारतीयाच्या जीवनाचा अविभाज्य संस्कार बनली, तरच राष्ट्रीय एकता दिनाचा खरा हेतू साध्य होईल.



डॉ. राजेंद्र बगाटे,
(लेखक, समाजशास्त्राचे अभ्यासक आहेत)
bagate.rajendra5@gmail.com

पान १ वरून

डॉ. सुभाष कन्नी यांच्या 'रावण'...

रावणाच्या व्यक्तिमत्त्वाचा वेगळ्या दृष्टिकोनातून वेध

'RAAVAN - THE RISE BEFORE THE FALL' हा चित्रपट केवळ पौराणिक कथानकापुरता मर्यादित नसून रावण या गुंतागुंतीच्या व्यक्तिरेखेचा वेगळ्या दृष्टिकोनातून शोध घेण्याचा प्रयत्न आहे. रावणाचे पारंपरिक चित्रण बाजूला ठेवून त्याचे सामर्थ्य, सत्ता, महत्त्वाकांक्षा, नेतृत्व, वारसा आणि अखेरच्या पतनामागील परिस्थिती अशा विविध पैलूंवर या चित्रपटातून प्रकाश टाकण्यात येणार आहे. 'The Rise Before the Fall' हे चित्रपटाचे शीर्षकच एका सामर्थ्यशाली व्यक्तिमत्त्वाचा उदय आणि त्याच्या पतनाकडे घेऊन जाणाऱ्या निर्णयांची नाट्यमय कहाणी सूचित करते. त्यामुळे पौराणिक विषयाला आधुनिक चित्रपटात्मक मांडणीची जोड देण्याचा प्रयत्न या चित्रपटातून करण्यात आला आहे.

AI तंत्रज्ञानातून चित्रपटनिर्मितीचा नवा प्रयोग

या चित्रपटाचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे AI-सहाय्यित हायब्रिड चित्रपटनिर्मिती. पारंपरिक चित्रपटनिर्मितीच्या तंत्रांसोबत कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञानाचा वापर करून चित्रपटाचे दृश्यविश्व आणि सर्जनशील अभिव्यक्ती अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. मात्र, चित्रपटाची कथा, संगीत आणि एकूण कलात्मक दिशा यामध्ये दिग्दर्शकाची सर्जनशील भूमिका केंद्रस्थानी ठेवण्यात आली आहे. स्वतंत्र हिंदी चित्रपटसृष्टीत आधुनिक तंत्रज्ञानाच्या माध्यमातून वेगळे प्रयोग करण्याच्या उद्देशाने डॉ. सुभाष कन्नी यांनी हा महत्त्वाकांक्षी प्रकल्प हाती घेतला आहे. विशेष म्हणजे, लेखक, दिग्दर्शक, संगीतकार आणि गीतकार अशा विविध भूमिका ते स्वतः सांभाळत आहेत.

YouTube वर गाण्यांना संगीतप्रेमींसाठी उपलब्धता

या दोन गाण्यांच्या प्रदर्शनामुळे चित्रपटाच्या प्रसिद्धी मोहिमेला सुरुवात झाली आहे. 'जो हारने से डर गया' आणि ह्यचलते रहेंगे' ही दोन्ही गाणी अधिकृत P S MOTION REELS या YouTube चॅनेलवर उपलब्ध करण्यात आली आहेत. पौराणिक कथानक, प्रेरणादायी संगीत, AI-सहाय्यित गायननिर्मिती आणि आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर यामुळे 'RAAVAN - THE RISE BEFORE THE FALL' हा चित्रपट स्वतंत्र चित्रपटनिर्मिती क्षेत्रातील एक वेगळा प्रयोग ठरण्याची अपेक्षा व्यक्त होत आहे. सोलापूरच्या मातीतून पुढे आलेल्या डॉ. सुभाष कन्नी यांच्या या चित्रपटामुळे सोलापूरच्या कलाक्षेत्रालाही राष्ट्रीय स्तरावर ओळख मिळण्याची संधी निर्माण झाली आहे.

उजनीच्या पाण्यावरून...

याचाही फरक दिसून येतो. त्यामुळे शासनाने अंतिम प्रकल्प आराखडा, सामंजस्य करार आणि प्रकल्पनिहाय पाणीवापर सार्वजनिक करणे गरजेचे आहे.

४२ हजार ८०० रोजगार विरुद्ध मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्न

देवेंद्र कोठे यांनी या प्रकल्पातून दोन हजार ८०० कायमस्वरूपी आणि ४० हजार प्रत्यक्ष-अप्रत्यक्ष रोजगार निर्माण होण्याची अपेक्षा व्यक्त केली आहे. सोलापूरच्या तरुणांना पुणे, मुंबई, बंगळुरू आणि हैदराबादकडे रोजगारासाठी धाव घ्यावी लागू नये, तर आधुनिक तंत्रज्ञान क्षेत्रातील संधी जिल्ह्यातच उपलब्ध व्हाव्यात, अशी त्यांची भूमिका आहे.

मात्र, रोजगाराच्या या आकड्यांबरोबरच स्थानिक मच्छीमारांच्या उपजीविकेचा प्रश्नही तितकाच महत्त्वाचा आहे. फ्लोटिंग सोलरमुळे मासेमारीवर नेमका किती परिणाम होणार, किती क्षेत्र मासेमारीसाठी उपलब्ध राहणार आणि बाधितांना कोणती भरपाई किंवा पर्यायी रोजगार दिला जाणार, याचे स्पष्ट उत्तर अद्याप आवश्यक आहे. रोजगारनिर्मितीचा दावा आणि पारंपरिक रोजगाराचे संरक्षण या दोन्ही बाबींची स्वतंत्रपणे पडताळणी होणे गरजेचे आहे.

१.५ टीएमसी पाण्याची बचत आणि १८० कोटींचे उत्पन्न; दाव्यांची कसोटी कधी?

फ्लोटिंग सोलर पॅनेलमुळे बाष्पीभवन कमी होऊन दरवर्षी सुमारे १.५ टीएमसी पाण्याची बचत होईल, असा शासनाचा अंदाज असल्याचे कोठे यांनी सांगितले आहे. तसेच या प्रकल्पातून महाराष्ट्र कृष्णा खोरे विकास महामंडळाला दरवर्षी १८० कोटी रुपयांचे उत्पन्न मिळण्याची अपेक्षा आहे. हा निधी उजनी प्रकल्प आणि पाणीवितरण व्यवस्थेच्या देखभाल-दुरुस्तीसाठी वापरण्याचे प्रस्तावित आहे.

मात्र, ही बचत कोणत्या वैज्ञानिक अभ्यासाच्या आधारे मोजण्यात आली आहे? ९ टक्के जलक्षेत्रावर सौरपॅनेल उभारल्याने प्रत्यक्षात किती बाष्पीभवन कमी होईल? १८० कोटींच्या उत्पन्नाचा वापर नेमका कोणत्या पद्धतीने होणार? या प्रश्नांची उत्तरे कागदोपत्री आणि प्रत्यक्ष अंमलबजावणीतूनच मिळणार आहेत.

आता शासनानेच दूध का दूध, पाणी का पाणी करावे!

उजनीच्या पाण्यावरून दोन वेगवेगळ्या भूमिका समोर आल्या असल्या, तरी या वादात सर्वाधिक महत्त्वाचे आहेत ते उजनीवर अवलंबून असलेले शेतकरी, मच्छीमार आणि सामान्य नागरिक. एका बाजूला रोजगार, गुंतवणूक आणि जागतिक तंत्रज्ञान क्षेत्रातील संधींचे आश्वासन आहे, तर दुसऱ्या बाजूला पाणीटंचाई, पर्यावरणीय परिणाम आणि पारंपरिक उपजीविका उद्ध्वस्त होण्याची भीती आहे.

सरकारने केवळ प्रसिद्धीपत्रकातून स्पष्टीकरण देण्यापेक्षा प्रकल्पनिहाय पाणीवापर, अंतिम आराखडा, पर्यावरणीय परिणाम अहवाल, रोजगाराचे स्वरूप, स्थानिकांचे हक्क आणि पाणीवाटपाची लेखी हमी सार्वजनिक करावी. शेतकरी, मच्छीमार, जलतज्ज्ञ आणि स्थानिक लोकप्रतिनिधींच्या उपस्थितीत खुली चर्चा घडवून आणावी.

उजनीचे पाणी वाचविणे आणि सोलापूरचा विकास करणे या एकमेकांच्या विरोधातील बाबी ठरू नयेत. मात्र विकासाच्या नावाखाली भविष्यातील पिढ्यांच्या पाण्याच्या हक्कांशी तडजोडही होता कामा नये. रोहित पवारांचा रास्ता रोको आणि देवेंद्र कोठे यांचे प्रकल्प समर्थन या दोन्ही भूमिकांमुळे आता सरकारची खरी कसोटी लागणार आहे. उजनीच्या पाण्यावर कोणाचा हक्क, प्रकल्पांचा प्रत्यक्ष फायदा कोणाला आणि संभाव्य नुकसान कोणाच्या वाट्याला, याचे उत्तर आता शासनाला द्यावेच लागणार आहे.

वात्रटिका

अर्णब इम्पॅक्ट

ढगाळ वातावरण बघून
मनात बरसात झाली...
होरपळलेल्या स्वप्नाला
पुन्हा पालवी फुटली...
करपून गेले ते तर पुन्हा
हिरवं होणार नाही...
दिवाळी कोणाची तशी
अंधारात जाणार नाही...

हणमंत पडवळ
धाराशिव
8698067566

हे दैनिक मालक-प्रकाशक, मुद्रक, संपादकः श्री पांडूरंग हरिदास सुरवसे यांनी संस्कृती प्रिंटींग प्रेस, एफ-3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003 येथे छापून येथूनच प्रसिद्ध केले. कार्यालयः एफ - 3, वृंदावन पार्क, होटगी रोड, सोलापूर - 413003
फोन/फॅक्स +91 217 355 0592 RNI No . MAHMAR 2006/17624 संपादकः पांडूरंग हरिदास सुरवसे, मो. (9765390339) उपसंपादकः सचिन मोहन जाधव, मो. (9657069069) कायदा सल्लागारः ॲड खतीब वकील.
Owner, Publisher, Printer and Editor Pandurang Haridas Survase Printing at Sanskruti Printing Press F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003. (Maharashtra) Published from Office F-3 Vrundavan Park, Hotagi Road, Solapur 413003.(Maharashtra) Phone- +91 217 355 0592 Editor Pandurang Survase-9765390339, Deputy Editor Sachin Jadhav-9657069069. **RNI No. MAHMAR 2006/17624**

उजनी धरणावर एआय डेटा सेंटर लादण्यास शेतकऱ्यांचा विरोध

पाण्याच्या हक्कासाठी आंदोलनाचे रणशिंग!

करमाळा (कटूसत्य वृत्त):- उजनी धरणाच्या पाणी वाटपात नसलेल्या लोकांना पाणी देताना अनेक नियम लावले जातात. वाढीव पाणी देतानाही काटकसर केली जाते. दुष्काळाची चाहूल लागली की वीज बंद केली जाते. अनेक निर्बंध शेतकऱ्यांवर टाकले जातात. मग अशा परिस्थितीत हे ए आय चे डाटा सेंटर उजनी वर लादण्यात काय अर्थ आहे. जे पाणी पिण्यासाठी व शेतीसाठी वापरले जाते अशा ठिकाणी हा प्रकल्प उभारून त्या संपूर्ण क्षेत्रावर कब्जा करण्याचा हेतू असल्याचं दिसून येत आहे. अशा चर्चा रंगू लागल्याने आता ग्रामीण भागापासून शहरी भागातून प्रचंड प्रमाणात पाठिंबा मिळत असल्याचे दिसून येत आहे. उजनी जलाशयावर केवळ परिसरातील शेतकरी अवलंबून नसून संपूर्ण जिल्ह्याचा कारभार यावर चालतो. तर जिल्हाच काय शेजारच्या जिल्ह्यातही उजनी येथून पाणी पाठवण्याचा निर्णय शासनाने वेळोवेळी घेतलेला आहे. अशा परिस्थितीत पिण्याचे पाणी व शेतीसाठी लागणारे पाणी पाठवले जात असताना शेतकऱ्यांनी मात्र कधीही एवढ्या मोठ्या प्रमाणात विरोध केलेला दिसून आलेला नव्हता. परंतु आता या डाटा सेंटर व इतर उपक्रमांच्या माध्यमातून उद्योजकांच्या घशात उजनी घालण्याचा डाव असल्याचे म्हणत शेतकऱ्यांनी रणशिंग फुंकले आहे.

ए आय अशा प्रकारच्या डाटा सेंटर मधून जर नोकरी उपलब्ध होत असेल उलाढाल वाढत असेल तर अशा प्रकारचे डाटा सेंटर इतर देशांनी का मान्य केले नसावेत. शिवाय ज्या ठिकाणी पाण्याचा वापर पिण्यासाठी किंवा शेतीसाठी केला जात नाही असे घाण पाणी स्वच्छ करून ही योजना राबवण्यास काय हरकत आहे. असे न करता पिण्यासाठी लागणारे स्वच्छ पाणी व शेतीसाठी वापरण्यात येणारे पाणी वापरल्यामुळे यातून येणाऱ्या काळात ग्रामीण व शहरी दोन्ही भागांचा पिण्याचा प्रश्न तर उपस्थित होईलच. शिवाय या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या शेजारच्या जिल्ह्यांवर ही याचा प्रभाव पडणार आहे.

शासनाने घेतलेला हा तुगलकी निर्णय त्वरित माघारी घ्यावा अशी मागणी करत शेतकऱ्यांनी ३१ ऑक्टोबरला रास्ता रोको आंदोलनाची घोषणा केली आहे यासाठी तालुक्यासह परिसरातील सर्वच शेतकऱ्यांनी वज्रमुठ बांधलेली दिसून येत आहे. आंदोलन करण्यापासून रोखले तर जलसमाधी घेण्याची ही तयारी शेतकऱ्यांची असल्याची बोलले जात आहे. त्यामुळे आता या आंदोलनात ग्रामीण भागापासून शहरी भागात मोठा प्रतिसाद पाहता शासन कोणता निर्णय घेते याकडे लक्ष लागून राहिले आहे.

ग्रंथालय कर्मचाऱ्यांची उपासमार थांबवा; ४० टक्के अनुदानवाढीचे आदेश तातडीने काढा!

वर्गबदलाच्या मंजुरीसाठीही राज्य ग्रंथालय संघ आक्रमक; अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांची मुख्यमंत्री व उच्च शिक्षणमंत्र्यांकडे मागणी

सोलापूर (कटूसत्य वृत्त) :- महाराष्ट्रातील सार्वजनिक ग्रंथालयांची आर्थिक परिस्थिती दिवसेंदिवस बिकट होत असून, ग्रंथालयांमध्ये काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांवर आर्थिक संकटाचे सावट गडद झाले आहे. महागाईचा वाढता भार आणि तुटपुंजे उत्पन्न यामुळे ग्रंथालय कर्मचाऱ्यांना उदरनिर्वाह करणेही कठीण झाले आहे. या पार्श्वभूमीवर सार्वजनिक ग्रंथालयांच्या अनुदानात ४० टक्के वाढ करण्यासह प्रलंबित वर्गबदलाच्या मंजुरीचे आदेश तातडीने काढावेत, अशी आक्रमक मागणी महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार यांनी केली आहे.

यासंदर्भात त्यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि उच्च व तंत्रशिक्षण मंत्री चंद्रकांत पाटील यांना निवेदन पाठविले आहे.

निवेदनात राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये आणि तेथे कार्यरत कर्मचाऱ्यांच्या दयनीय आर्थिक परिस्थितीवर लक्ष वेधण्यात आले आहे. महागाईच्या काळात अन्न, वस्त्र, निवारा, मुला-मुलींचे शिक्षण, विवाह, औषधोपचार, घरभाडे तसेच वीज आणि पाणीबिलांचा खर्च भागविताना कर्मचाऱ्यांची मोठी आर्थिक ओढाताण होत आहे. उत्पन्नाचे दुसरे कोणतेही साधन नसल्याने अनेक कर्मचाऱ्यांसमोर कुटुंबाचा उदरनिर्वाह करण्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाला आहे.

विशेष म्हणजे, ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना उपदान, पेन्शन, अर्जित रजेचे रोखीकरण आणि प्रवास भत्ता यांसारख्या सुविधांचाही लाभ मिळत नसल्याचे संघटनेने निवेदनात नमूद केले आहे. त्यामुळे आयुष्यभर ग्रंथालयीन सेवा बजावूनही कर्मचाऱ्यांच्या भविष्याची आर्थिक सुरक्षितता धोक्यात आली आहे. काही कर्मचाऱ्यांवर टोकाचे पाऊल उचलण्याची वेळ येत असल्याची गंभीर बाबही संघटनेने मांडली आहे.

केवळ आश्वासन नको, शासन निर्णय हवा!

सार्वजनिक ग्रंथालये ही समाजाच्या शैक्षणिक, सांस्कृतिक आणि वैचारिक जडणघडणीचा महत्त्वाचा आधार आहेत. मात्र, या ग्रंथालयांचे कामकाज सांभाळणाऱ्या कर्मचाऱ्यांच्याच प्रश्नांकडे शासनाचे दुर्लक्ष होत असेल, तर ग्रंथालय चळवळीचे भविष्य काय, असा सवाल उपस्थित होत आहे. ग्रंथालयांच्या अनुदानवाढीचा आणि वर्गबदलाचा प्रश्न किती दिवस प्रलंबित ठेवणार, असा प्रश्नही संघटनेने उपस्थित केला आहे. कर्मचाऱ्यांची आर्थिक परिस्थिती, वाढती महागाई आणि ग्रंथालय चळवळीचे महत्त्व लक्षात घेऊन शासनाने आता केवळ आश्वासनांवर वेळ न दवडता ४० टक्के अनुदानवाढ आणि वर्गबदल मंजुरीचे आदेश तातडीने निर्गमित करावेत, अशी ठाम भूमिका डॉ. कोटेवार यांनी निवेदनातून मांडली आहे.

या निवेदनावर महाराष्ट्र राज्य ग्रंथालय संघाचे अध्यक्ष डॉ. गजानन कोटेवार, कार्याध्यक्ष गुलाबराव पाटील, कोषाध्यक्ष भीमराव पाटील, प्रमुख कार्यवाह सोपानराव पवार आणि कार्यउपाध्यक्ष राम मेकले यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

कार्यकर्त्यांच्या राजकीय वर्तुळात 'दुष्काळाचे सावट'

सुधीरजी खरटमल यांच्या अनुपस्थितीची सोलापुरात जोरदार चर्चा..

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- राजकीय क्षेत्रात आपल्या कार्यकर्त्यांशी असलेले जिव्हाळ्याचे संबंध, अडीअडचणीच्या काळात धावून जाण्याची वृत्ती आणि कार्यकर्त्यांना बळ देणारे नेतृत्व यामुळे ओळखले जाणारे ज्येष्ठ नेते आदरणीय सुधीरजी खरटमल हे गेल्या दोन-तीन दिवसांपासून सोलापूर शहरात नसल्याने त्यांच्या कार्यकर्त्यांमध्ये त्यांच्या अनुपस्थितीची चर्चा रंगू लागली आहे. कार्यकर्त्यांचे आधारस्तंभ आणि प्रेरणास्थान मानल्या जाणाऱ्या खरटमल यांच्या अनुपस्थितीमुळे कार्यकर्त्यांच्या राजकीय वतुर्ळात जणू 'दुष्काळाचे सावट' निर्माण झाल्याची उपरोधिक चर्चा सुरू आहे.

राजकारणात केवळ पद, प्रतिष्ठा किंवा राजकीय समीकरणे महत्त्वाची नसतात, तर कार्यकर्त्यांशी असलेले भावनिक नाते आणि त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होणारे नेतृत्वही तितकेच महत्त्वाचे असते. सुधीरजी खरटमल यांनी आपल्या राजकीय आणि सामाजिक कार्यातून कार्यकर्त्यांशी जिव्हाळ्याचे संबंध निर्माण केले आहेत. त्यामुळे त्यांच्या भेटीगाठी, मार्गदर्शन आणि स्नेहपूर्ण संवादाची कार्यकर्त्यांना नेहमीच अपेक्षा असते.

गेल्या काही दिवसांपासून खरटमल सोलापूर शहरात नसल्याने त्यांच्या नेहमीच्या भेटीगाठींची सवय असलेल्या कार्यकर्त्यांना त्यांच्या आगमनाची प्रतीक्षा लागली आहे. कार्यकर्त्यांच्या दैनंदिन राजकीय चर्चांमध्येही त्यांच्या अनुपस्थितीचा विषय चर्चिला जात असल्याचे चित्र आहे.

नेत्याचे महत्त्व त्याच्या पदावरून नव्हे, तर त्याच्या अनुपस्थितीत कार्यकर्त्यांना जाणवणाऱ्या पोकळीवरूनही अधोरेखित होते, असे या निमित्ताने म्हणता येईल. सुधीरजी खरटमल यांच्याविषयी कार्यकर्त्यांच्या मनात असलेली आपुलकी आणि त्यांच्या मार्गदर्शनाची अपेक्षा यामुळे त्यांच्या अनुपस्थितीची चर्चा सोलापूरच्या राजकीय वतुर्ळात लक्षवेधी ठरत आहे.

आता सुधीरजी खरटमल सोलापुरात कधी परतणार आणि कार्यकर्त्यांच्या भेटीगाठींचा नेहमीचा सिलसिला पुन्हा कधी सुरू होणार, याकडे त्यांच्या समर्थकांचे लक्ष लागले आहे.

शंकरनगरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डोळे तपासणीची सुविधा उपलब्ध

अकलूज (कटूसत्य वृत्त):- शंकरनगर (ता.माळशिरस) येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात जेष्ठ नागरिक व वयोवृद्ध महिलांचे डोळे तपासणी त्याच बरोबर मोफत मोतीबिंदु शस्त्रक्रिया सेवा उपलब्ध करून देण्यात आल्यामुळे ग्रामीण भागातील जेष्ठ नागरिकांची चांगली सोय झाली आहे.त्यामुळे डोळयाच्या रूग्णांमध्ये आनंदाचे वातावरण पसरले आहे.

गेल्या अनेक वर्षांपासून शंकरनगरच्या प्राथमिक आरोग्य केंद्रात डोळे तपासणीची सोय उपलब्ध नसल्यामुळे या भागातील जेष्ठ नागरिक व वयोवृध्द महिलांना डोळे तपासणीसाठी अकलूज येथे जावे लागत होते पण आजपासून डोळे तपासणी सुरू झाल्यामुळे अकलूजला जाण्याचा रूग्णांचा त्रास संपला आहे. प्राथमिक आरोग्य केंद्रात डोळ्याचे डॉक्टर अनिल कटके-पाटील यांची नेमणूक झाल्यामुळे शंकरनगर, पानीव, खुडूस, विझोरी, विजयवाडी, गिरझणी, चौंडेश्वरवाडी, उदयनगर या गावातील लोकांची डोळे तपासण्याची सोय उपलब्ध झाली आहे. जेष्ठ नागरिक व महिला वर्ग यांच्या डोळयांची तपासणी व मोफत मोतीबिंदुची शस्त्रक्रियेची करण्यात येणार आहेत.

जनकल्याण आरोग्य समितीचे सदस्य शहाजीराव माने-देशमुख यांनी डॉ.अनिल कटके-पाटील व वैद्यकीय अधिकारी डॉ.अमोल आव्हाड यांचा फेटा, पुष्पहार देऊन सत्कार करण्यात आला.यावेळी विजयवाडी ग्रामपंचायतीचे सरपंच तथा जनकल्याण आरोग्य समितीचे सदस्य उमेश भंडारे, सुभाष पाटोळे,श्रीमती क्षीरसागर, पवार, आरोग्य सेविका श्रीमती चाबुकस्वार, हणमंत चव्हाण यावेळी उपस्थित होते.

अकलूज नगरपरिषद,अकलूज

ता, माळशिरस.जि.सोलापूर (महाराष्ट्र)

फोन - (०२१८५) २२२०३५,२२२५९२स्थापना

email-comcakluj21@gmail.com

दिनांक ०३-०८-२०२१

जा.क्र.अ.न.प ३०१९/२०२६ दि.३०/१०/२०२६

जाहीर लिलाव सूचना

अकलूज नगरपरिषद मार्फत नगरपरिषद हद्दीतील गट क्र. ९२/३अ१/१पै. या खुल्या जागेत फटाके गाळ्यांचे जाहिर लिलाव दि. ०२/११/२०२६ रोजी सकाळी १२.०० वाजता अकलूज नगरपरिषद सभागृह येथे आयोजित करण्यात येणार आहे. तरी इच्छुक लिलाव धारकाने दि. ०२/११/२०२६ रोजी सकाळी १० ते ११.३० पर्यंत बयाणा रक्कम ५००/- रू. नगरपरिषद कोषागरात भरणा करावी. लिलाव अटी शर्ती खाली प्रमाणे..

१. लिलाव धारकाने बयाणा रक्कम भरली नसल्यास लिलावात भाग घेता येणार नाही. तसेच फटाके गाळे लिलाव बोली रक्कम रू. २०००/- पासुन सुरू होईल व बोली रक्कम १००० रू च्या पटीत वाढवणेत येईल

२.इच्छुक लिलावधारकांची मागील आर्थिक वर्षातील फटाका स्टॉल ची थकबाकी असल्यास लिलावात भाग घेता येणार नाही.

३. लिलावबोली बोललेनंतर सदर बोली रकमेच्या ५०% रक्कम स्टॉल ताब्यात घेणेच्या आधी भरणे बंधनकारक राहील.

४.स्टॉलधारकाने उर्वरीत ५०% रक्कम पुढील ४ दिवसात भरणे बंधनकार राहील.

अधिक माहीतीसाठी मिळकत विभाग, अकलूज नगरपरिषद कार्यालयात संपर्क साधावा.

सचिन पाटील
मुख्याधिकारी गट-अ(निवड श्रेणी)
अकलूज नगरपरिषद, अकलूज

मालमत्ता कर वसुलीसाठी महापालिकेची धडक मोहीम

दोन दिवसांत १ कोटी ५३ लाखांची वसुली!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर महानगरपालिकेच्या मालमत्ता कर विभागाच्या वतीने शहरात मालमत्ता कर वसुलीसाठी विशेष धडक मोहीम हाती घेण्यात आली आहे. चालू आर्थिक वर्षातील मालमत्ता कराची वसुली वाढविण्यासाठी तसेच थकबाकी वसूल करण्यासाठी महापालिका प्रशासनाने कारवाई अधिक तीव्र केली आहे. मालमत्ता कराची थकबाकी असलेल्या नागरिकांच्या मालमत्ता सील करणे, तसेच आवश्यकतेनुसार नळजोडणी बंद करणे यांसारखी कठोर कारवाई करण्यात येत आहे.

या विशेष वसुली मोहिमेला नागरिकांकडून प्रतिसाद मिळत असून, दि. २९ ऑक्टोबर २०२६ रोजी एका दिवसात तब्बल ९३ लाख रुपयांची मालमत्ता कर वसुली करण्यात आली. तर दि. ३० ऑक्टोबर २०२६ रोजी ६० लाख रुपयांची वसुली करण्यात आली आहे. अशा प्रकारे अवघ्या दोन दिवसांत एकूण १ कोटी ५३ लाख रुपयांचा मालमत्ता कर महापालिकेच्या तिजोरीत जमा झाला आहे.

महानगरपालिकेच्या उत्पन्नाचा मालमत्ता कर हा प्रमुख स्रोत असून, शहरातील पाणीपुरवठा, रस्ते, स्वच्छता, आरोग्य, पथदिवे तसेच विविध नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी या उत्पन्नाचा उपयोग केला जातो. त्यामुळे नागरिकांनी आपल्याकडील मालमत्ता कर वेळेत भरणे आवश्यक आहे.

थकबाकीदारांनी वारंवार सूचना देऊनही मालमत्ता कर भरला नसल्यास संबंधित मालमत्तांवर सील लावण्याची तसेच नळजोडणी बंद करण्याची कारवाई केली जात आहे. त्यामुळे नागरिकांनी कोणतीही कारवाई होण्यापूर्वी आपला थकीत मालमत्ता कर तातडीने भरून महापालिकेला सहकार्य असे आव्हान महापालिका आयुक्त डॉ. सचिन ओम्बासे यांनी केले.

शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांना अधिक चांगल्या नागरी सुविधा उपलब्ध करून देण्यासाठी मालमत्ता कराचा नियमित भरणा करणे ही प्रत्येक मालमत्ताधारकाची जबाबदारी आहे. त्यामुळे सर्व नागरिकांनी थकीत व चालू मालमत्ता कर लवकरात लवकर भरून दंडात्मक कारवाई टाळावी, असे आवाहन सोलापूर महानगरपालिकेच्या वतीने करण्यात आले आहे.

आमच्याकडे केशर आंबा, हापूस,
मोठी फळझाडे, फुलझाडे, शोभिवंत झाडे,
इन डोअर गुलाब, बोन्साय, आरेकापाम इ.रोपे
होलसेल दरात विक्रीसाठी उपलब्ध.
मनोरमा रोपवाटिका, सोरेगाव, विजापूर रोड, सोलापूर
संपर्क - 9422602337, 8317212037

Classified - छोटी जाहीरात

बोअरवेल

सोलापूरात प्रथमच मशिनद्वारे २ फूट व्यासाचे खोल पाण्याची विहीर खोदून मिळेल. संपर्क - शिवगंगा वॉटर वेल-सर्व्हिस रविवार पेठ, सोलापूर.
9420766666

(सरकार मान्य)
अथर्व पेस्ट कंट्रोल
An ISO 9001-15
सर्टीफाईड कंपनी
प्रोप्रा. हरी सुभाष विरपे
9822964815
9421984815
झुरळ, पाल, मुंगी, वाळवी, डास, जाळी, माशी, ढेकुण, उंदीर, घुस इ. नियंत्रण

पाहिजेत

चिंचोळी MIDC, सोलापूर शहर करिता **सिक्युरिटी गार्ड** त्वरित पाहिजे.
संपर्क 9145451809
भेटण्याची वेळ - 11:30 ते 2 वा.

वर-वधू

जन्मका जोडी विवाह दुल्हन सूचना केंद्र

सभी जातियों के विरशैव लिंगायत वर-वधू के लिए सभी जातियों के प्रथं एवं द्वितीय वर-वधू के लिए हमसे संपर्क करे। मुस्लिम विवाह ब्रोकर, बंजारा और लंबाणी विवाह ब्रोकर, मुस्लीम मैरेज ब्रोकर, अंधीगर चौड़व्या मैरेज ब्रोकर, दनगर समाज मैरेज ब्रोकर, जय भीम समाज मैरेज ब्रोकर, वधू वर माहीती केंन्द्र

आमच्याकडे सगळ्या समाजाच्या वधु-वर साठी संपर्क करा.
मु.पो.पितापुर, ता. अक्कलकोट, जि. सोलापूर
उमेश माने
मो. 9353370779
रेखा बर्वे
मो. 7218370779

वाचकांसाठी निवेदन: या अंकात प्रसिद्ध होणाऱ्या सर्व प्रकारच्या जाहिरातीमधील मजकूर जाहिरातदाराने दिल्यानुसार प्रसिद्ध केला जातो. यातील कोणत्याही माहितीच्या अथवा आहवानाच्या सत्यतेबाबत दैनिक कटूसत्य हमी घेऊ शकत नाही याची कृपया नोंद वाचकांनी घ्यावी.

कटूसत्य शब्दकोडे



उभे शब्द : १) आईची बहीण २) अंतराळातील अवकाशवाहन ३) पंधरा दुणे ४) देशपातळीवर काम केलेले महाराष्ट्रातील ज्येष्ठ नेते ५) शर्थ, नियम ६) नाकाने ओढावयाची तंबाखूची पूड ९) नगरपालिकेवर निवडून दिलेला लोकप्रतिनिधी १०) केंद्रीय मंत्री-नारायण ** १२) दुर्ग, किल्ला १३) शिवकालीन छुपी लढाईची पध्दत-गनिमी ** १४) सणादिवशी करतात तो गोड खाद्यपदार्थ १५) भिंतीवरील सरपटणारा प्राणीजीव १७) दह्यात पाणी मिसळून बनविलेले पेय १८) छोटी चारचाकी प्रवासी गाडी २०) एखाद्यास वश करण्याचे उपाय-** ** ** भेद २१) हनुमानाच्या उपासनेचा दिवस, एक म्हण-न कर्त्याचा वार **** २२) फलंदाजाच्या शंभर धावा २३) गन उलट लिहा २५) एखाद्या कामाचे घेतलेले व्रत २६) वरवर, वरल्या मनाने २८) भारतीय क्रिकेट टीमचे प्रशिक्षक-** शास्त्री ३०) तरचा जोडीदार ३२) एक म्हण-आपला ** जगन्नाथ, कर ३३) कागदी चलन ३४) एक म्हण-*** जीव सदाशिव ३५) देवांचा राजा ३६) गती, स्पीड ३७) बासरी ३८) तीन दुणे ३९) एक कडधान्य

आडवे शब्द : १) उत्तरप्रदेशमधील बहुजन समाजवादी पार्टीच्या अध्यक्षा
४) एक नेते-*** सिन्हा
५) राज ठाकरे यांच्या मुलाचे नाव ७) एक (इंग्रजीत)
८) उन्हाळा (इंग्रजीत) ९) कलाकार, बोल्टचा साथीदार
११) प्रवासाने होणारा त्रास १३) काकाचा बायको १४) राष्ट्रवादी अध्यक्ष शरद पवार यांचा जिल्हा १५) उडिदाच्या पिठापासून बनवितात तो रूचकर पदार्थ, लिज्जत कंपनीचे हे उत्पादन प्रसिध्द आहे १६) शनिवार नंतरचा दिवस
१७) धातूचा तंतू १८) गोंधळ, गोंगाट १९) खंबीर, मजबूत २०) हळू, मंद गतीने
२३) मीठ (हिंदीत) २४) आकाशाचा रंग
२५) वेळी अवेळी मेघ गर्जनेसह पडणारा पाऊस
२७) हनुमानाच्या हातातील शस्त्र २८) याच्यापासून शिरा बनवितात २९) परीट, धोबी ३१) एक महान संत ३३) सेवक, *** चाकर
३४) श्रीगणेशाचे एक नाव ३६) हॉटेलमधील सेवक
३७) पाकिस्तान संक्षिप्तमध्ये असे लिहितात-** ३८) सागर, रत्नाकर ४०) एक द्विदल कडधान्य
४१) स्वस्तच्या विरूध्दार्थी

सुडोकु - 89

	3		4	9			1	
7	4			1	8			
1	9	6	7				2	4
			5		1	7	6	2
		3		2	7		5	9
				4		3		
	7	8	9					
4	2	9					7	3
			3	7			9	8

जिल्हा बँक निवडणुकीत बाळराजे पाटलांचे शक्तिप्रदर्शन

उमेदवारी अर्ज दाखल करताच बिनविरोध व चेअरमन पदाची जोरदार चर्चा !

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली, राजन पाटील यांच्या मार्गदर्शनात मोहोळची ताकद

'सहकारात राजकारण नको, संस्थांचे हित महत्त्वाचे' म्हणत बाळराजेंचा बिनविरोधचा आग्रह

सोलापूर (कटूसत्य वृत्त) :- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या पंचवार्षिक निवडणुकीचे वातावरण तापू लागले असतानाच मोहोळ तालुक्यातून माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष विक्रांत ऊर्फ बाळराजे राजन पाटील यांनी समर्थकांच्या मोठ्या उपस्थितीत उमेदवारी अर्ज दाखल करून जोरदार शक्तिप्रदर्शन केले. मात्र, उमेदवारी अर्ज दाखल करतानाच त्यांनी निवडणूक बिनविरोध व्हावी, अशी ठाम भूमिका मांडल्याने जिल्ह्याच्या सहकार आणि राजकीय वतुर्ळात चचेर्ला उधाण आले आहे. विशेष म्हणजे, अर्ज दाखल होताच बाळराजे पाटील यांच्या नावाची संभाव्य चेअरमनपदासाठीही चर्चा सुरू झाल्याने या निवडणुकीला वेगळेच राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे.

पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या नेतृत्वाखाली, माजी आमदार राजन पाटील यांच्या मार्गदर्शनात तर माजी आमदार यशवंत (तात्या) माने यांची प्रमुख उपस्थितीत मोहोळ तालुक्याचे नेतृत्व जिल्हा बँकेच्या निवडणुकीत सक्रिय झाले आहे. सोलापूर येथील जिल्हा उपनिबंधक कार्यालयात निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हा उपनिबंधक मुकुंद पवार यांच्याकडे विक्रांत ऊर्फ बाळराजे पाटील आणि मुख्यमंत्री पानंद रस्ते योजनेचे मोहोळ विधानसभा अध्यक्ष अजिंक्यराणा राजन पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केले. यावेळी मोहोळ तालुक्यातील जिल्हा दूध संघाचे व्हाइस चेअरमन दिपक माळी, पंचायत समितीचे सभापती अस्लम चौधरी, कृषी उत्पन्न बाजार समितीचे माजी सभापती नागेश साठे व प्रशांत बचुटे यांच्यासह प्रमुख पदाधिकारी, कार्यकर्ते आणि समर्थकांनी मोठ्या संख्येने हजेरी लावल्याने जिल्हा उपनिबंधक कार्यालय परिसरात राजकीय वातावरण निर्माण झाले होते.

शक्तिप्रदर्शनासोबत बिनविरोधचा संदेश!

उमेदवारी अर्ज दाखल करणे म्हणजे निवडणुकीच्या मैदानात उतरण्याची तयारी; मात्र त्याचवेळी निवडणूक बिनविरोध व्हावी, असे आवाहन करणे ही बाळराजे पाटील यांची भूमिका चचेर्चा विषय ठरली आहे. 'सहकार क्षेत्रात राजकारण नको, राजकारणापेक्षा सहकारी संस्थांचे हित महत्त्वाचे आहे,' असा स्पष्ट संदेश त्यांनी दिला. सोलापूर जिल्ह्याला सहकाराची मोठी परंपरा लाभली असून, या परंपरेचे जतन करण्यासाठी निवडणुका प्रतिष्ठेचा विषय न बनवता सर्वांच्या सहमतीने पार पडल्या पाहिजेत, असे त्यांनी सांगितले.

सहकारमहर्षी शंकरराव मोहिते-पाटील, लोकनेते बाबूराव अण्णा पाटील, नामदेवराव जगताप, ब्रह्मदेवदादा माने, शिवदारे, परीचारक आणि चाकोते यांच्यासारख्या ज्येष्ठ नेत्यांनी जिल्ह्यात सहकाराची पायाभरणी केली. त्यांनी दिलेला सहकाराचा विचार पुढे नेणे ही आजच्या नेतृत्वाची जबाबदारी आहे. त्यामुळे दूध संघ असो किंवा जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँक, अशा महत्त्वाच्या संस्थांच्या निवडणुका शक्यतो बिनविरोध व्हाव्यात, अशी भूमिका बाळराजे पाटील यांनी मांडली.

चेअरमनपदाच्या चर्चेला उधाण!

बाळराजे पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल केल्यानंतर त्यांच्या राजकीय अनुभवासोबतच जिल्हा बँकेच्या संभाव्य नेतृत्वाबाबतही चर्चा सुरू झाली आहे. बँकेच्या निवडणुकीत त्यांची भूमिका स्पष्ट असल्याने, अनगरकरांनी सहकारात आजपर्यंत कधीही गटातटाचे राजकारण न केल्याने त्यांना सर्वच गटांचा पाठिंबा असल्याने भविष्यात चेअरमनपदाची माळ त्यांच्या गळ्यात पडणार आहे. त्यामुळे सहकार क्षेत्रात तर्कवितर्कांना सुरुवात झाली आहे. मात्र, चेअरमनपदाबाबत अद्याप कोणताही अधिकृत घोषणा झालेली नसली तरी चर्चा मात्र बाळराजे पाटील यांचीच आहे.

बिनविरोधसाठी ज्येष्ठ नेत्यांची कसोटी!

एका बाजूला उमेदवारी अर्ज दाखल होत आहेत, तर दुसऱ्या बाजूला बिनविरोध निवडणुकीचे आवाहन केले जात आहे. त्यामुळे आगामी काळात जिल्ह्यातील विविध राजकीय गट आणि सहकार क्षेत्रातील नेते यांच्यात कोणत्या प्रकारची चर्चा होते, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे. सर्वसमावेशक सहमती घडवून आणण्यात ज्येष्ठ नेत्यांना यश आले, तर जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याचा मार्ग मोकळा होऊ शकतो.

एकंदरीत, मोहोळमधून बाळराजे पाटील यांनी उमेदवारी अर्ज दाखल करत केलेले शक्तिप्रदर्शन आणि त्याचवेळी बिनविरोध निवडणुकीसाठी घेतलेली भूमिका ही जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील महत्त्वाची राजकीय घडामोड ठरत आहे. आता ही निवडणूक खरोखरच बिनविरोध होणार, की राजकीय प्रतिष्ठेच्या लढाईत रूपांतरित होणार? तसेच बाळराजे पाटील यांच्या नावाभोवती सुरू झालेली चेअरमनपदाची चर्चा प्रत्यक्षात कितपत पुढे जाणार, याची उत्सुकता संपूर्ण सोलापूर जिल्ह्याला लागली आहे.

जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी माजी आमदार राजन पाटील यांनी यापूर्वीच आपली भूमिका स्पष्ट केली होती. आता बाळराजे पाटील यांनीही त्याच भूमिकेला जाहीर पाठिंबा दिल्याने या आवाहनाला राजकीय महत्त्व प्राप्त झाले आहे. जिल्ह्यातील सर्व गटांतील आणि पक्षांतील ज्येष्ठ नेत्यांनी एकत्र येऊन सहमती घडवून आणावी, असे आवाहनही त्यांनी केले. आपण स्वतः या प्रक्रियेसाठी पुढाकार घेत असून, जिल्ह्यातील ज्येष्ठ नेतेही प्रयत्नशील असल्याने निवडणूक बिनविरोध होईल, असा विश्वास त्यांनी व्यक्त केला.

शेतकरीहित आणि सहकारातील पारदर्शकतेचा अजेंडा घेऊन शहाजी पवार मैदानात!

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल; शेतकऱ्यांच्या प्रश्नांना न्याय देण्याचा निर्धार

सोलापूर (कटूसत्य वृत्त) :- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीचे वातावरण आता तापू लागले असून, या निवडणुकीच्या निमित्ताने इच्छुक उमेदवारांनी आपापली राजकीय आणि सहकार क्षेत्रातील ताकद पणाला लावण्यास सुरुवात केली आहे. याच पार्श्वभूमीवर शहाजी पवार यांनी आपला उमेदवारी अर्ज दाखल करून निवडणुकीच्या मैदानात अधिकृतपणे पाऊल टाकले आहे. शेतकरीहित, सहकार क्षेत्रातील पारदर्शक कारभार आणि सोलापूर जिल्ह्याच्या सर्वांगीण विकासाचा संकल्प घेऊन आपण निवडणूक लढवत असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

सहकार क्षेत्र हे ग्रामीण अर्थव्यवस्थेचा कणा असून जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची भूमिका शेतकरी, विविध कार्यकारी सेवा सोसायट्या, सहकारी संस्था आणि ग्रामीण भागातील आर्थिक व्यवहारांसाठी अत्यंत महत्त्वाची आहे. त्यामुळे बँकेचा कारभार अधिक लोकाभिमुख, पारदर्शक आणि शेतकऱ्यांना दिलासा देणारा असणे गरजेचे आहे. याच भूमिकेतून आपण निवडणुकीला सामोरे जात असल्याचे शहाजी पवार यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना कर्जपुरवठा, पीक कजार्चे प्रश्न, आर्थिक अडचणी आणि सहकारी संस्थांसमोरील विविध समस्या यांची आपल्याला जाणीव आहे. शेतकऱ्यांच्या अडचणी केवळ ऐकून न घेता त्या सोडविण्यासाठी बँकेच्या माध्यमातून ठोस निर्णय घेणे आवश्यक आहे. शेतकऱ्यांचे आर्थिक हित जपणे, त्यांच्या हक्कांसाठी प्रभावीपणे आवाज उठविणे आणि सहकार क्षेत्रात विश्वासाचे वातावरण निर्माण करणे, याला आपले सर्वोच्च प्राधान्य राहील, असा विश्वासही त्यांनी व्यक्त केला.

जिल्हा बँक ही केवळ आर्थिक व्यवहार करणारी संस्था नसून जिल्ह्यातील शेतकरी आणि सहकार चळवळीला बळ देणारी महत्त्वाची यंत्रणा आहे. त्यामुळे बँकेच्या कामकाजात पारदर्शकता, जबाबदारी आणि सर्वसामान्य घटकांना न्याय देणारी कार्यपद्धती असणे काळाची गरज आहे. सहकार क्षेत्रातील सर्व घटकांना सोबत घेऊन जिल्ह्याच्या विकासासाठी काम करण्याचा आपला प्रयत्न राहील, असेही पवार यांनी नमूद केले.

शहाजी पवार यांनी उमेदवारी अर्ज दाखल करताना त्यांच्यासोबत जिल्हा परिषदेचे उपाध्यक्ष इंद्रजीत पवार, भाजप नेते अविनाश महागावकर, सोलापूर जिल्हा सहकारी पतसंस्था फेडरेशनचे अध्यक्ष दिलीप पतंगे, भाजप उत्तर तालुका अध्यक्ष संभाजी दडे, भाजप ओबीसी मोचार्चे जिल्हाध्यक्ष विनायक सुतार, शिलरन्त गायकवाड यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

या उपस्थितीमुळे शहाजी पवार यांच्या उमेदवारीला राजकीय आणि सहकार क्षेत्रातील मान्यवरांचे पाठबळ असल्याचे चित्र दिसून आले. जिल्हा बँकेच्या निवडणुकीत शेतकरीहित, पारदर्शक कारभार आणि सहकार क्षेत्राच्या बळकटीकरणाचा मुद्दा केंद्रस्थानी येण्याची शक्यता असून, शहाजी पवार यांच्या उमेदवारीमुळे निवडणुकीतील राजकीय समीकरणांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

विरोधकांनी सोसायटीचे सभासदत्वही नाकारले; तेच राजेंद्र राऊत जिल्हा बँकेवर बिनविरोध..!

१३५ पैकी तब्बल १३३ ठराव राऊतांच्या बाजूने; बार्शीच्या राजकारणातून सहकाराच्या सत्ताकेंद्रापर्यंत मजल

सोलापूर (कटूसत्य वृत्त) : बार्शीच्या राजकारणात एकेकाळी ज्यांना विरोधकांनी सोसायटीचे सभासदत्वही मिळू दिले नाही, त्याच आमदार राजेंद्र विठ्ठल राऊत यांनी आता सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीत आपली बिनविरोध एंट्री निश्चित केल्याची चर्चा राजकीय वतुर्ळात रंगली आहे. विशेष म्हणजे, १३५ ठरावांपैकी तब्बल १३३ ठराव राऊत यांच्या बाजूने मिळाल्याचा दावा करण्यात येत असून, हा आकडा सहकार क्षेत्रातील त्यांच्या वाढत्या प्रभावाची चर्चा घडवून आणणारा ठरला आहे.

सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीसाठी उमेदवारी अर्ज दाखल करण्याची आज अंतिम तारीख होती. या पार्श्वभूमीवर राजेंद्र राऊत यांच्या उमेदवारीकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले होते. बार्शीच्या राजकारणात अनेक संघर्षांना सामोरे गेलेल्या राऊत यांनी आता जिल्हा बँकेच्या निवडणुकीत बिनविरोध प्रवेश मिळविल्याचे चित्र समोर आले आहे.

राजेंद्र राऊत यांच्या राजकीय प्रवासातील हा महत्त्वाचा टप्पा मानला जात आहे. ज्या सहकारी संस्थांच्या सभासदत्वावरून कधीकाळी त्यांना विरोधाचा सामना करावा लागला, त्याच सहकार क्षेत्रातील जिल्ह्याच्या महत्त्वाच्या आर्थिक संस्थेत प्रतिनिधित्व मिळविण्यापर्यंत त्यांनी मजल मारली आहे. त्यामुळे त्यांच्या समर्थकांकडून या घडामोडीचे विशेष स्वागत केले जात आहे.

विकासरत्न म्हणून ओळखले जाणारे आणि विधान परिषदेच्या निवडणुकीत विक्रमी मताधिक्याने विजयी झाल्याचा उल्लेख केला जाणारे आमदार राजेंद्र विठ्ठल राऊत यांच्या या प्रवेशामुळे जिल्हा बँकेतील राजकीय समीकरणांनाही महत्त्व प्राप्त झाले आहे.

सोसायटीच्या सभासदत्वापासून जिल्हा बँकेपर्यंतचा हा प्रवास म्हणजे बार्शीच्या राजकारणातील संघर्षाची नवी चर्चा ठरली आहे. मात्र, १३३ ठरावांचा दावा, उमेदवारीची वैधता आणि बिनविरोध निवडीची अधिकृत घोषणा याबाबत निवडणूक निर्णय अधिकाऱ्यांची अंतिम पुष्टी महत्त्वाची ठरणार आहे.

मोहिते-पाटील बंधू अखेर डीसीसी बँकेच्या निवडणूक रिंगणात; बिनविरोधाची शक्यता कायम!

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या निवडणुकीने आता वेग घेतला असून, मोहिते-पाटील गटाने अखेर निवडणुकीच्या मैदानात उतरण्याचा निर्णय घेतला आहे. माजी आमदार रणजितसिंह मोहिते-पाटील यांनी समर्थकांसह उपस्थित राहून उमेदवारी अर्ज दाखल केला. त्यामुळे जिल्हा बँकेच्या निवडणुकीतील राजकीय समीकरणांना नवे वळण मिळाले आहे.

गेल्या काही दिवसांपासून जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध व्हावी, यासाठी राजकीय पातळीवर प्रयत्न सुरू होते. माजी आमदार राजन पाटील यांनीही सर्वपक्षीय नेत्यांना एकत्र येऊन सहकार क्षेत्रातील ही निवडणूक सामंजस्याने पार पाडण्याचे आवाहन केले होते. मात्र, विविध राजकीय गटांकडून उमेदवारी अर्ज दाखल होत असल्याने निवडणुकीतील स्पर्धा वाढण्याची चिन्हे दिसू लागली आहेत.

बिनविरोधासाठी पडद्यामागे हालचाली सुरूच!

मोहिते-पाटील गटाने उमेदवारी अर्ज दाखल केला असला, तरी जिल्हा बँकेची निवडणूक बिनविरोध होण्याची शक्यता अद्याप कायम आहे. खासदार धैर्यशील मोहिते-पाटील यांनीही बिनविरोध निवडीसाठी जाणकार व्यक्तींशी चर्चा सुरू असल्याची भूमिका मांडल्याचे सांगितले जात आहे. त्यामुळे एका बाजूला निवडणुकीची तयारी सुरू असताना दुसऱ्या बाजूला राजकीय नेत्यांमध्ये समन्वय साधण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे चित्र आहे.

१९ जागांसाठी राजकीय मोर्चेबांधणी

जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या १९ संचालकपदांसाठी ही निवडणूक होत आहे. जिल्ह्यातील प्रमुख राजकीय नेत्यांनी आपापल्या गटांची ताकद एकवटण्यास सुरुवात केली आहे. मोहिते-पाटील गटाच्या उमेदवारीमुळे निवडणुकीतील राजकीय संघषार्ची चर्चा पुन्हा सुरू झाली आहे.

अर्ज दाखल झाले; आता माघारीकडे लक्ष!

उमेदवारी अर्ज दाखल करणे आणि प्रत्यक्ष निवडणूक लढविणे या वेगवेगळ्या प्रक्रिया आहेत. त्यामुळे अर्ज दाखल झाल्यानंतरही जागावाटप, राजकीय तडजोडी आणि उमेदवारी माघारीच्या माध्यमातून बिनविरोध निवडीचा मार्ग निघू शकतो. त्यामुळे आगामी काळात कोण कोणाची साथ देणार, कोण माघार घेणार आणि कोण निवडणुकीच्या रिंगणात कायम राहणार, याकडे जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

मोहिते-पाटील बंधूंच्या उमेदवारीमुळे निवडणुकीतील समीकरणे बदलण्याची शक्यता निर्माण झाली असली, तरी बिनविरोध निवडीसाठीचे प्रयत्नही सुरू आहेत. त्यामुळे सोलापूर जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेची निवडणूक प्रत्यक्ष मतदानापर्यंत पोहोचणार की शेवटच्या क्षणी राजकीय समझोता होऊन संचालकांची बिनविरोध निवड होणार, याची उत्सुकता शिगेला पोहोचली आहे.

विजापूर रोडवर उभारणार नवे एसटी बसस्थानक

१ हेक्टर जागेच्या प्रस्तावाला मंजुरी

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- गेल्या अनेक वर्षापासून सातत्याने विस्तारणाऱ्या जुळे सोलापूर परिसरातील नागरिकांसाठी दिलासादायक बातमी समोर आली आहे. विजापूर रस्त्यावर नवीन एसटी बसस्थानक उभारण्याच्या प्रक्रियेला वेग आला असून, या प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या १ हेक्टर जागेच्या प्रस्तावाला महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळाच्या (टरफ्ळउ) संचालक मंडळाने अधिकृत मान्यता दिली आहे. आमदार सुभाष देशमुख यांच्या दीर्घकालीन पाठपुराव्याला अखेर मोठे यश मिळाले आहे.

जागा संपादनाचे विविध पर्याय खुले

एसटी महामंडळाच्या मध्यवर्ती कार्यालयाने आमदार सुभाष देशमुख यांना दिलेल्या लेखी माहितीनुसार, या बसस्थानकासाठी १ हेक्टर जागा विनामूल्य, नाममात्र दराने किंवा

नियमित भाडेतत्त्वावर उपलब्ध करून घेण्याचे प्रयत्न केले जाणार आहेत. हे पर्याय शक्य न झाल्यास शासकीय दरानुसार (रेडीरेकनर/शासकीय मूल्यांकनानुसार) जागा थेट संपादित करण्याचा प्रस्ताव मंजूर करण्यात आला आहे. सक्षम प्राधिकाऱ्यांनी या प्रस्तावावर शिक्कामोर्तब केले असून महामंडळाच्या संचालक मंडळाच्या बैठकीत त्यासंबंधीचा ठरावही मंजूर करण्यात आला आहे.

विभागीय पातळीवरील पुढील कार्यवाही प्रलंबित

मुख्यालय आणि संचालक मंडळाकडून मंजुरी मिळाली असली, तरी जागा निश्चिती व प्रत्यक्ष भूसंपादनाची पुढील आवश्यक कार्यवाही विभागीय स्तरावर सुरू असून ती पूर्ण झाल्यानंतर प्रत्यक्ष कामाला गती मिळणार असल्याचे पत्रात नमूद आहे.

लाखो नागरिकांना दिलासा मिळणार

गेल्या काही दशकांत जुळे सोलापूर आणि विजापूर रोड परिसरात मोठ्या प्रमाणावर नागरी वस्ती वाढली आहे. सध्या या भागातील नागरिकांना, नोकरदारांना, महाविद्यालयीन विद्यार्थ्यांना तसेच ज्येष्ठ नागरिकांना एसटी पकडण्यासाठी शहराच्या मध्यवर्ती बसस्थानकावर जावे लागते.

नवीन बस स्थानकाचा काय फायदा?

- नागरिकांचा वेळ आणि अंतर्गत प्रवासाचा खर्च वाचेल.
- मुख्य बसस्थानकावरील आणि शहरातील अंतर्गत वाहतुकीवरील ताण मोठ्या प्रमाणावर कमी होईल.
- दक्षिण महाराष्ट्र आणि कर्नाटकच्या दिशेने जाणाऱ्या प्रवाशांची मोठी सोय होईल.
- शासकीय पातळीवर तत्त्वतः मंजुरी मिळाल्यामुळे आता प्रत्यक्ष जागा संपादनाची प्रक्रिया लवकरात लवकर पूर्ण होऊन बसस्थानकाच्या प्रत्यक्ष बांधकामाला कधी सुरुवात होते, याकडे समस्त जुळे सोलापूरकरांचे लक्ष लागले आहे.

ऑर्किड स्कूलमध्ये फॅन्सी ड्रेस स्पर्धेत चिमुरड्यांच्या वेशभूषेतून अवतरले समाजप्रबोधन

सोलापूर (कटूसत्य वृत्त):- शालेय जीवनातच विद्यार्थ्यांच्या सुप्त गुणांना वाव मिळावा आणि त्यांच्यातील व्यासपीठ भीती दूर व्हावी, या उद्देशाने सोलापूर येथील नागेश करजगी ऑर्किड स्कूलमध्ये नुकतेच एका अभिनव फॅन्सी ड्रेस स्पर्धेचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धेत बालचमूंनी केवळ मनोरंजनात्मक वेशभूषा न करता ज्वलंत सामाजिक विषय आणि थोर व्यक्तिमत्त्वांचे विचार मंचावर जिवंत केले.

या स्पर्धेचे उदघाटन सोलापुरातील प्रसिद्ध सौंदर्यतज्ञ प्रगती क्षीरसागर, सौ रेणुका राजेश कळमणकर, स्कूलचे व्यवस्थापक अक्षय चिडगुंपी, शाळेच्या मार्गदर्शिका मीना पारखे, प्राचार्या रश्मी कुंभार यांच्या प्रमुख उपस्थितीत करण्यात आले. दोन दिवसीय या स्पर्धेत विद्यार्थ्यांनी अनेक भुमिका साकारत आपली कला सादर केली.

सध्या शिक्षण क्षेत्रात गाजत असलेल्या 'पेपरफुटी' व दुष्काळ या अतिशय संवेदनशील विषयावर विद्यार्थ्यानी आपल्या अभिनयातून प्रकाश टाकला. परीक्षा पद्धतीतील त्रुटींवर व दुष्काळी नियोजनावर चिमुकल्याने ओढलेले कोरडे उपस्थितांना विचार करायला लावून गेले.

स्पर्धेमध्ये एका विद्यार्थ्याने ज्येष्ठ अभिनेते नाना पाटेकर यांची हुबेहूब वेशभूषा करून त्यांच्याच खास शैलीत संवाद फेकले. त्याची ती आगळीवेगळी देहबोली आणि दमदार सादरीकरण पाहून संपूर्ण सभागृह टाळ्यांच्या कडकडाटाने गुंजून उठले. देशाचे थोर क्रांतिकारक भगतसिंग यांच्या वेशभूषेने उपस्थितांमध्ये देशभक्तीचे वातावरण निर्माण केले, तर दुसरीकडे भारताच्या राष्ट्रपती द्रौपदी मुर्मु यांची वेशभूषा साकारून एका विद्यार्थिनीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले.

तसेच बालचमूंनी विविध देवी-देवतांची रूपे साकारून संपूर्ण वातावरण भक्तीमय करून सोडले. कोणी हातात बासरी घेतलेला नटखट 'बालकृष्ण' बनले होते, तर कोणी त्रिशूळ धारी महादेव. माता सरस्वती, लक्ष्मी आणि संकटमोचक हनुमानाची हुबेहूब वेशभूषा करून मंचावर आलेल्या चिमुकल्यांना पाहून जणू काही देवच भूतलावर अवतरले आहेत, असा भास उपस्थितांना झाला.

या विषयांसोबतच बहुरंगी कार्टूनची भूमिका करणाऱ्या मुलांनी मंचावर धमाल करत उपस्थितांमध्ये हास्याची कारंजी उडवली. स्पर्धेत सहभागी प्रत्येक विद्यार्थ्याचा आत्मविश्वास वाखाणण्याजोगा होता. विद्यार्थ्यांनी केवळ पोशाख परिधान केला नव्हता, तर त्या पात्रांचे महत्त्वही आपल्या छोट्या भाषणांतून पटवून दिले. उत्कृष्ट सादरीकरण करणाऱ्या विजेत्यांना आकर्षक सन्मानचिन्ह व प्रमाणपत्र देऊन गौरविण्यात आले, तसेच सर्व सहभागी मुलांचे कौतुक करण्यात आले.

शाळेचे प्राचार्या, शिक्षक वृंद आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी केलेल्या शिस्तबद्ध नियोजनामुळे ही स्पर्धा कमालीची यशस्वी ठरली.

शंकरराव मोहिते महाविद्यालयात नशामुक्त भारत विशेष कार्यशाळा संपन्न

अकलूज (कटूसत्य वृत्त):- "व्यसनामुळे मनुष्याचे आयुष्य उध्वस्त होत चालले आहे त्यामुळे आपले राष्ट्र कमकुवत होत चालले आहे. असे मत व्यसनमुक्त युवक संघाचे प्रा. धनंजय देशमुख यांनी व्यक्त केले. ते अकलूजच्या शंकरराव मोहिते महाविद्यालयात नशामुक्त भारत अभियाना अंतर्गत विशेष कार्यशाळा आयोजित केली होती त्यावेळेस ते बोलत होते. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर होते. प्रमुख अतिथी म्हणून पुण्यश्लोक आहिल्यादेवी होळकर सोलापूर विद्यापीठाचे राष्ट्रीय सेवा योजना विभागाचे संचालक डॉ. राजेंद्र वडजे, मेरा भारत युवा विभागाचे अनिल हिंगे, सुभाष चव्हाण, राष्ट्रीय सेवा योजना माळशिरसचे विभागीय समन्वयक डॉ. अनिल लोंढे तसेच माळशिरस विभागातील सर्व महाविद्यालयांचे कार्यक्रमाधिकारी व विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

त्यावेळी पुढे बोलताना प्राध्यापक देशमुख म्हणाले की," कुमारवय व युवा अवस्थेतच व्यसनांचा पगडा मुलांवर मनावर निर्माण आहे म्हणून सर्वानी सजग राहणे आवश्यक आहे. वय वाढीच्या वयात आहार महत्त्वाचा आहे. आहारामध्ये आवश्यक आहार व आकर्षक आहार यातील फरक ओळखून योग्य ते निवडायला विद्यार्थ्यांनी शिकले पाहिजे.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. शिवप्रसाद टिळेकर यांनी अध्यक्षीय मनोगतात विद्यार्थ्यांना व्यसनांपासून दूर राहण्याचे आवाहन केले. अनिल हिंगे यांनी प्रास्ताविक केले. महाविद्यालयाचे कार्यक्रमाधिकारी प्रा. दत्तात्रय मगर यांनी उपस्थितांचे स्वागत करून विद्यार्थ्यांना नशा मुक्तीची शपथ दिली. प्रा. स्मिता पाटील यांनी सूत्रसंचालन केले तर प्रा. सज्जन पवार यांनी आभार मानले.